रायगड, नवी मुंबई
# रामप्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक ६५
www.ramprahar.com
रविवार, २२ सप्टेंबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

नेरळमध्ये कारची तीन विद्यार्थ्यांना धडक, एक ठार/२
'रविप्रहर'मध्ये विविध विषयांवरील लेख/४
सणाचे दिवस संपताच मासळी खरेदीसाठी गर्दी/६

## सर्व घटकांसाठी सरकारच्या योजना –उपमुख्यमंत्री पवार



**श्रीवर्धन** : उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शनिवारी (दि. २१) जन सन्मान यात्रेच्या निमित्ताने रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन येथे संवाद साधला. या वेळी त्यांनी केंद्रातील अनेक योजना सर्व समाजासाठी राबवल्या. राज्यातील योजनांमध्येदेखील सर्व समाजांचा समावेश असल्याचे सांगितले. उपमुख्यमंत्री पवार यांचे राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, राज्याच्या महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे यांनी स्वागत केले. राज्य सरकारच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या सर्व योजना या दीर्घकाळ चालाव्यात यासाठी तुमच्या भक्कम पाठिंब्याची, आशीर्वादाची गरज आहे. यंदाच्या विधानसभा निवडणुकीत महायुतीला साथ द्या, कोकणसह अख्ख्या महाराष्ट्राचा गतिमान विकास साधण्यात आम्ही कुठेही कमी पडणार नाही, असा शब्द उपमुख्यमंत्र्यांनी दिला.

# वारकऱ्यांना सोयीसुविधा देणार

### उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन



**पुणे : प्रतिनिधी**

महाराष्ट्रात वारीचे महत्त्व मोठे आहे. देहू, आळंदी आणि पंढरपूर या तीर्थक्षेत्रांकडे जाणाऱ्या वारकऱ्यांना योग्य प्रकारच्या सुविधा मिळाल्या पाहिजेत, रस्ते रूंद झाले पाहिजेत, पालखी मार्ग वेगळा करून त्या मार्गावर सर्व प्रकारच्या सोयी असल्या पाहिजेत या दृष्टीने काम होत आहे. वारकऱ्यांना पालखी तळावरही विविध सोयीसुविधा देण्याकरिता त्या ठिकाणी भूसंपादनाची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. येत्या काळात वारकऱ्यांना आवश्यक त्या सर्व सोयीसुविधा देण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी (दि. २१) येथे केले.

भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या वतीने पुण्यातील महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या कर्वेनगरातील कमिन्स महाविद्यालय येथे आयोजित जिल्ह्यातील विविध प्रकल्पांच्या भूमिपूजन समारंभात उपमुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

या समारंभास केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्गमंत्री नितीन गडकरी, केंद्रीय सहकार आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे सहकारमंत्री दिलीप वळसे-पाटील, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, खासदार मेधा कुलकर्णी, सुप्रिया सुळे, आमदार उमा खापरे, योगेश टिळेकर, अमित गोरखे, माधुरी मिसाळ, भीमराव तापकीर, सिद्धार्थ शिरोळे आदी उपस्थित होते.

पुणे नवीन विमानतळाचे जगद्गुरू संत तुकाराम महाराजांचे नामकरण करण्याबाबत येत्या मंत्रिमंडळ बैठकीत प्रस्ताव मांडण्यात येईल आणि केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी पाठविण्यात येईल, असे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ म्हणाले की, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम पालखी मार्गांचे बांधकाम होत आहे. रस्ते वाहतूक मंत्रालयाच्या माध्यमातून गेल्या १० वर्षांच्या काळात महाराष्ट्रात सर्वाधिक महामार्ग निर्माण झाले आहेत.

मंत्री दिलीप वळसे-पाटील यांनी, पुणे शहर एक मोठे केंद्र झाले आहे. शहरातील वाहतूक सुरळीत करण्याकरिता रस्त्यांची प्रलंबित कामे करून प्रश्न मार्गी लावावी. देहू, आळंदी आणि पंढरपूर विकास आराखड्याला गती देण्याकरिता केंद्र शासनाने सहकार्य करावे, असे म्हटले.

मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, पालखी महामार्गांवरून जाणाऱ्या वारकऱ्यांसाठी विविध सुविधा करण्यात आल्या आहेत. वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी करण्यात येणाऱ्या प्रयत्नांना सहकार्य करण्यात येईल. खासदार मेधा कुलकर्णी, सुप्रिया सुळे, आमदार भीमराव तापकीर यांनीही आपले विचार व्यक्त केले.

### 'नवीन विमानतळाला संत तुकाराम महाराजांचे नाव देण्यासाठी प्रयत्न'

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. पुण्यातील नवीन विमानतळाचे काम चांगले झाले असून या नवीन विमानतळाला जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांचे नाव देण्याबाबतच्या प्रस्तावाला मंजुरीसाठी प्रयत्न करण्यात येतील, असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्गमंत्री नितीन गडकरी यांनी या वेळी केले. वारकऱ्यांच्या सुविधेच्या अनुषंगाने दोन्ही पालखी मार्गाकरिता सुमारे १२ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे, असेही त्यांनी सांगितले.

## ही शान कुणाची... पनवेलमधील मार्केटच्या राजाची!



# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते सपत्नीक पूजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथील महात्मा ज्योतिबा फुले हातगाडी संघटनेच्या वतीने गौरा गणेशोत्सवानिमित्त लालबागच्या राजाची प्रतिकृती पनवेलमध्ये विराजमान झाली आहे. या मार्केटच्या राजाचे पूजन आमदार प्रशांत ठाकूर आणि त्यांच्या सुविद्य पत्नी वर्षा ठाकूर यांच्या हस्ते शनिवारी (दि. २१) करण्यात आले. या वेळी त्यांनी गणरायाचे मनोभावे दर्शन घेत जनतेच्या सुख, समृद्धी आणि शांतीचा मार्ग सुलभ व्हावा, अशी प्रार्थना केली.



या गौरा गणेशोत्सवाचे यंदाचे ३२वे वर्ष असून सामाजिक बांधिलकी जोपासून हा उत्सव महात्मा ज्योतिबा फुले हातगाडी संघटनेचे अध्यक्ष एस.के. नाईक यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या भक्तीमय वातावरणात हजारो भाविकांच्या उपस्थितीत साजरा केला जातो. सर्वांचे आकर्षण असलेल्या या गणपतीचे दर्शन घेण्यासाठी अलोट गर्दी झाली होती. या वेळी महात्मा ज्योतिबा फुले हातगाडी संघटना गौरा गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष प्रल्हाद नाईक, सचिव दिलीप अनभुले, इतर पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.

## निवडक

### एअर मार्शल अमरप्रीत सिंग भारतीय हवाई दल प्रमुखपदी

**नवी दिल्ली** : पाच हजार तासांपेक्षा जास्त उड्डाणाचा अनुभव असलेले एअर मार्शल अमरप्रीत सिंग भारतीय हवाई दलाचे पुढील प्रमुख असतील. ते सध्या हवाई दलाचे उपप्रमुख म्हणून कार्यरत आहेत. विद्यमान एअर चीफ मार्शल विवेक राम चौधरी ३० सप्टेंबर रोजी सेवेतून निवृत्त होणार आहेत. एअर मार्शल अमरप्रीत सिंग त्यांची जागा घेतील, अशी माहिती संरक्षण मंत्रालयाने दिली.



### विवेक पाटील यांच्या जामीन अर्जावर आता मंगळवारी निकाल

**पनवेल** : कर्नाळा नागरी सहकारी बँकेच्या सुमारे ५४३ कोटी रुपयांच्या घोटाळाप्रकरणी बँकेचे अध्यक्ष आणि शेकापचे माजी आमदार विवेक पाटील यांच्या जामीन अर्जावरील निकालासंदर्भात शनिवारी (दि. २१) पनवेल जिल्हा न्यायालयात कोणतीही कार्यवाही झाली नाही. या निकालासाठी न्यायाधीश वडने यांनी आता २४ सप्टेंबर ही तारीख दिली आहे.

# खालापुरातील विविध पक्षांचे कार्यकर्ते भाजपमध्ये

### आमदार महेश बालदी यांनी केले स्वागत





**चौक : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाची सर्वसमावेशक कार्यप्रणाली आणि उरण विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार महेश बालदी यांच्या विकासकार्यावर आकर्षित होऊन अनेकांचा भारतीय जनता पक्षात प्रवेश होत आहे. यालाच अनुसरून खालापूर तालुक्यातील चौक तारापूर येथील शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाच्या आणि वावर्ले येथील राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षासह अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. आमदार महेश बालदी यांनी सर्वांचे स्वागत केले.

भाजप उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे व खालापूर तालुका अध्यक्ष प्रवीण मोरे यांच्यावर विश्वास ठेवून शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे चौक तारापूर येथील दीपक माळी, गजानन भोईर, निशांत फुलावरे, निखिल गरूडे, अंकिता मकी, अलका माळी, अरुणा भोईर, कुणाल माळी, विनीत माळी या प्रमुख कार्यकर्त्यांसह अन्य कार्यकर्त्यांनी भाजपचा झेंडा हाती घेतला, तर वावर्ले येथील राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदोष भद्रिके, सामाजिक कार्यकर्ते मनोहर कडू, रमेश भद्रिके यांच्यासह अनेक जण भाजपमध्ये दाखल झाले.

तारापूर आणि वावर्ले येथे झालेल्या या कार्यक्रमांना भाजपचे खालापूर तालुका अध्यक्ष प्रवीण मोरे, चौक शहर अध्यक्ष गणेश कदम, उपाध्यक्ष सागर ओसवाल, रामदास ठोंबरे, सचिन साखरे, सचिन चौधरी आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. आमदार महेश बालदी यांच्यासह अन्य मान्यवरांनी पक्षप्रवेशकर्त्यांचे भाजपमध्ये स्वागत केले.

## मुरूडमध्ये दिव्यांग मुलीवर अत्याचार; नराधम अटकेत

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अल्पवयीन दिव्यांग मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याची घटना मुरूड तालुक्यातील मिठेखार येथे समोर आली आहे. या प्रकरणी ५० वर्षीय नराधमाला रेवदंडा पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत.



मिठेखार येथे जुलैमध्ये ही घटना घडलेली आहे. पीडित १५ वर्षीय दिव्यांग मुलगी घरात एकटी असताना गणपत डोलकर हा नराधम तिच्या घरात घुसला आणि त्याने तिच्यावर लैंगिक अत्याचार केला तसेच याबाबत कोणाला काही सांगितल्यास हत्या करण्याची धमकी दिली. दोन ते तीन वेळा हा प्रसंग तिच्यासोबत घडला.

एकदा गावच्या सार्वजनिक विहिरीवर पीडित मुलगी एकटी असतानाही नराधमाने तिच्यावर बळजबरी केली तसेच आई, वडिलांना सांगितले तर तुझे तुकडे तुकडे करीन अशी धमकी दिली. त्यामुळे घाबरलेली मुलगी गप्प राहिली, मात्र पीडितेची मासिक पाळी चुकल्यानंतर ही बाब तिच्या आईच्या लक्षात आला. तिने विचारपूस केल्यावर मुलीने सर्व प्रकार सांगितला. या प्रकरणी रेवदंडा पोलिसांनी गणपत डोलकर याच्याविरोधात गुन्हा दाखल केला असून त्याला अटक करण्यात आली आहे. या घटनेचा अधिक तपास सुरू आहे.

## पनवेलमध्ये आज जयपूर फूट बसविण्याचा कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक मंडळ पनवेल, साधू वासवानी मिशन पुणे, भारतीय जनता पक्ष, रायगड जिल्हा मेडिकल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. २२) जयपूर फूट बसविण्याचा कार्यक्रम मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर व उपाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आला आहे.



मोफत कृत्रिम हात व पाय अर्थात जयपूर फूटसंदर्भात लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त ऑगस्ट महिन्यात शिबिर झाले होते. या शिबिरात हात, पाय नसलेल्या दिव्यांग व्यक्तींची तपासणी करून त्या अनुषंगाने कृत्रिम हात, पायासाठी मापे घेण्यात आली होती. अशा व्यक्तींना हे कृत्रिम अवयव रविवारी बसविण्यात येणार आहेत. हा कार्यक्रम सकाळी ९ वाजता पनवेल शहरातील मार्केट यार्ड येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात होणार आहे.

## राम मंदिर प्रतिकृती



**अलिबाग : गौरा गणेशोत्सावनिमित्त श्रीबागचा राजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने राम मंदिराची प्रतिकृती उभारली आहे.**

## बांगलादेशविरुद्धच्या पहिल्या कसोटीवर भारताची पकड

**चेन्नई : वृत्तसंस्था**

बांगलादेशविरुद्ध चेन्नई येथे खेळल्या जात असलेल्या पहिल्या कसोटी सामन्यावर भारतीय संघाने आपली पकड मजबूत केली आहे. भारताने आपला दुसरा डाव २८७ धावांवर घोषित करून बांगलादेशला विजयासाठी तब्बल ५१३ धावांचे आव्हान दिले आहे. या अशक्यप्राय आव्हानाचा पाठलाग करताना पाहुण्यांनी ४ बाद १५८ धावा केल्या आहेत.

दुसऱ्या डावात रोहित शर्मा (५), यशस्वी जैस्वाल (१०), विराट कोहली (१७) अशी टॉप ऑर्डर अपयशी ठरल्यानंतर शुभमन गिल आणि ऋषभ पंत यांनी डाव सावरत शतके केली. गिलने १७६ चेंडूंचा सामना करत नाबाद ११९ धावा केल्या. यात १० चौकार आणि चार षटकारांचा समावेश होता, तर पंतने १३ चौकार आणि चार षटकारांसह १२८ चेंडूंत १०९ धावा केल्या. खराब हवामानामुळे तिसऱ्या दिवसाचा खेळ पूर्ण होऊ शकला नाही. बांगलादेशने दुसऱ्या डावात चार गडी गमावून १५८ धावा केल्या आहेत.

### शुबमन गिल आणि ऋषभ पंतचे शतक



# रायगड जिल्ह्यातील किनारे झाले चकाचक!

## स्वच्छता ही सेवा उपक्रमांतर्गत अभियान



**रायगड : रामप्रहर वृत्त**

स्वच्छ भारत मिशन ग्रामीण व शहरी यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा गांधी जयंतीचे औचित्य साधून स्वच्छता ही सेवा मोहीम १४ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत राबविण्यात येत आहे. या अंतर्गत रायगड जिल्हा परिषदेतर्फे जिल्ह्यातील समुद्रकिनाऱ्यांवर स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

या वर्षीच्या स्वच्छता ही सेवा २०२४ साठी स्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छता ही थीम निश्चित केली आहे. या मोहिमेंतर्गत रायगड जिल्हा परिषद पाणी व स्वच्छता मिशन विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी शुभांगी नाखले यांच्या मार्गदर्शनाखाली आवास समुद्रकिनारी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

या वेळी जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक जयवंत गायकवाड, सुरेश पाटील, रवीकिरण गायकवाड, सुनील माळी, ग्रुप ग्रामपंचायत आवास सरपंच अभिलाषा राणे, ग्रामविकास अधिकारी जयेश पाटील, ग्रामपंचायत सदस्य, सागरी सीमा मंच यशोधन जोगळेकर, निमेश परब, बा. ना. हायस्कूलचे विद्यार्थी व शिक्षक, तसेच आवासमधील ग्रामस्थ उपस्थित होते.

उपस्थितांना मार्गदर्शन करताना जयवंत गायकवाड यांनी, चांगल्या स्वच्छता सवयी अंगिकाराव्या. यासाठी स्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छता महत्त्वाची आहे. आता नागरिकांनी माझा कचरा माझी जबाबदारी या भूमिकेतून घरच्या घरी ओला व सुका कचरा वेगळा करून पर्यावरणपूर्वक स्वच्छता करण्याला प्राधान्य द्यावे. जल, जंगल, हवा, जमीन ही राष्ट्रीय संपत्ती आहे. त्याचे स्वच्छता राखून जतन करावे, असे आवाहन केले.

जिल्ह्यात नांदगाव, मुरूड, किहीम, वरसोली, अलिबाग, नागाव, उरण बीच या ठिकाणी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. जिल्हा पाणी व स्वच्छता कक्ष, संबंधित ग्रामपंचायत, सागरी सीमा मंच, एनएसएस विद्यार्थी, मेरीटाईम बोर्ड, ग्रामस्थ, एनजीओ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

या वेळी प्रतिज्ञा, रॅली, श्रमदान, मानवी साखळी उपक्रम राबविण्यात आले.

# नेरळमध्ये भरधाव कारची तीन विद्यार्थ्यांना धडक

## उपचार घेताना एकाचा मृत्यू

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत-कल्याण राज्यमार्ग रस्त्यावर शनिवारी (दि.२१) सकाळी ७ वा. नेरळ विद्यामंदिर कनिष्ठ महाविद्यालयात जात असलेल्या तीन विद्यार्थ्यांना कुडाळ-अंबरनाथ असा प्रवास करणाऱ्या इर्टिका कारने जोरदार धडक दिली.

यातील एक विद्यार्थी गाडीच्या चाकाखाली गेल्याने गंभीर जखमी होऊन त्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. या हिट अँड रन प्रकरणी नेरळ पोलिसांनी गाडीचालकास अटक केली आहे.

नेरळ ग्रामपंचायत हद्दीमधील जुम्मापट्टी भागातील धसवाडी येथील विद्यार्थी कर्जत-कल्याण रस्त्याने चालत नेरळ विद्यामंदिर तसेच



कनिष्ठ महाविद्यालय येथे जात असतात. शनिवारी सकाळी भगवान सखाराम पारधी, विशाल आलू दरवडा आणि मयूर मोहन पारधी हे तिघे विद्यार्थी कॉलेजला रस्त्याच्या डाव्या बाजूने चालत असताना त्यांच्या मागून भरधाव वेगात येणाऱ्या पांढऱ्या इर्टिका गाडी (एमएच ०५ सीव्ही २८३४) ने या तिन्ही विद्यार्थ्यांना धडक दिली.

गाडीने दिलेली धडक एवढी भीषण होती की, मयूर पारधी थेट गाडीच्या चाकाखाली गेला. दुसरे दोन विद्यार्थी गाडीचे बोनेटवरून थेट गाडीच्या काचेवर आदळले. जखमी झालेल्या तिन्ही विद्यार्थ्यांना चालक लोचन दिलीप धुरी याने स्थानिकांच्या मदतीने रुग्णालयात नेले, मात्र त्यांना तत्काळ बदलापूर येथे नेण्यास सांगितले. कॉलेजचे प्राध्यापक हनुमंत भगत हे विद्यार्थ्यांसोबत बदलापूर येथील रुग्णालयात नेण्यास रुग्णवाहिकेसह पुढे निघाले.

पोलिसांनी चालक लोचन धुरी यास पोलीस ठाण्यात नेले. बदलापूर येथील खासगी रुग्णालयात भगवान सखाराम पारधी आणि विशाल आलू दरवडा या दोघांवर उपचार सुरू आहेत, मात्र तर गाडीच्या चाकाखाली गेलेला मयूर पारधी यास डोंबिवली येथील रुग्णालयात उपचार घेत असताना मृत्यू झाला.

# भिरा प्रकल्पामुळे पनवेलला मिळणार ५०० दशलक्ष लीटर पाणी

**खारघर : प्रतिनिधी**

पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी संचालक कार्यालयाने भिरा येथील टाटा वीज प्रकल्पातील वीजनिर्मितीनंतर विसर्ग होणाऱ्या पाण्यापैकी ५०० दशलक्ष लीटर पाणी दरदिवसा पनवेलकरांना मिळणार आहे.



यासाठीच्या प्रस्तावाला कोकण पाटबंधारे विकास महामंडळाच्या कार्यकारी संचालकांनी मंजुरी देऊन तो प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे. यामुळे हा प्रस्ताव राज्य शासनाच्या कोर्टात असून यामुळे पनवेलकरांचा पाण्याचा प्रश्न मिटणार आहे.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रासाठी २२५ दशलक्ष पाण्याची मागणी आहे. भविष्यात ही मागणी ६५० दशलक्ष लिटर पाण्याच्या पुढे जाण्याची शक्यता आहे.

हे पाणी आणण्यासाठी पनवेल महानगरपालिकेला जलवाहिनी टाकण्यासाठी ३४०० कोटी खर्च येणार आहे. ९० किलोमीटरवरून हे पाणी आणावे लागणार आहे.

पनवेलच्या शहरी भागात पाण्याची कमरतेची चर्चा होते, मात्र ग्रामीण भागात अवस्था थोडी बिकट आहे. पनवेल महानगरपालिका हद्दीत १०पेक्षा जास्त गावे आणि आदिवासी वाड्यांमध्ये पाणी पोहचविण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

# पनवेल मनपा हद्दीतील अनधिकृत फलक, कमानींवर कारवाई

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील चारही प्रभागांतील अनधिकृत फलक, झेंडे व कमानींवर तोडक कारवाईस सुरुवात झाली आहे. गेल्या दोन दिवसांत या कारवाईदरम्यान एकूण ६०७ बॅनर्स, १४२ झेंडे, २४ कमानींवर कारवाई करण्यात आली आहे.



महापालिका कार्यक्षेत्रातील कळंबोली, कामोठा, पनवेल, खारघर चारही प्रभागामध्ये उभारण्यात आलेल्या अनधिकृत फलक, झेंडे व कमानींवर कारवाई करण्याबाबत आयुक्तांनी निर्देश दिले होते. त्यानुसार उपायुक्त रवीकिरण घोडके व सहाय्यक आयुक्त सुबोध ठाणेकर यांच्या सूचनेनुसार गेल्या दोन दिवसांपासून चारही प्रभागामध्ये त्या त्या प्रभागातील प्रभाग अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अनधिकृत फलक, झेंडे व कमानींवर तोडक कारवाई करण्यात येत आहे.

या कारवाईदरम्यान चारही प्रभागातील एकूण ६०७ राजकीय बॅनर, १४२ झेंडे, २४ कमानी काढण्यात आल्या आहेत.

## चोरी करणाऱ्यास २४ तासांत अटक

**पेण : प्रतिनिधी**

शहरातील गुरुकृपा आईस्क्रीम या दुकानात चोरी करणाऱ्या चोरट्यास पोलिसांनी २४ तासांत अटक केली आहे.

गुरुकृपा आईस्क्रीम दुकानात गुरुवारी चोरट्याने रात्रीच्या सुमारास ड्रॉवरमधून २० हजार रुपये व महत्त्वाची कागदपत्रे चोरी केल्याची घटना घडली होती. या प्रकरणी पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. आरोपीचा गोपनीय तसेच तांत्रिक बाबीच्या आधारे शोध घेऊन पोलिसांनी आरोपी गणेश विशाल मेहर (वय १९, रा.गोकुळ नगर, फणसडोंगरी पेण) यास मुद्देमालासह अटक केली आहे.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे / जमीन मालकांबरोबर बोलणी करून सदर मिळकत खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे तळोजे मजकुर, ता. पनवेल, जि. रायगड**

| भोगवटादाराचे नाव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ. मी | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| कल्पना सुरेश रुघाली | ३६ | ०-५८-०० | ४.७५ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीवर मालक/भोगवटादार अशी नावे असलेल्या व्यक्ती म्हणजेच **कल्पना सुरेश रूघानी,** यांच्या नावाची नोंद आहे. तरी सदर वर वर्णन केलेल्या मिळकतीशी कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, वारसाहक्क, वहिवाट, साठेकरार, खरेदीखत, पोटगी, एम.ओ.यू. अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्या व्यक्तीने वर नमूद केलेल्या हक्काबाबत त्यांच्याजवळ असलेल्या योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदरची नोटीस वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झाल्यापासून **१५ (पंधरा)** दिवसाचे आत खालील पत्यावर लेखी हरकत घ्यावयाची आहे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत नोंदविली नाही तर, वर नमुद केलेला व्यवहार पुर्ण केला जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी

**पनवेल,**
**दिनांक :- २१/०९/२०२४**

**सही/-**
**अॅड. अतिश सुनील परदेशी**
**अॅड. हायकोर्ट**
**मोबा नं. ९७०२८९८९८९**
**गाळा नं. ७, फडके नाट्यगृह कॉम्प्लेक्स,**
**श्री समर्थ कृपा झेरॉक्स, पनवेल,**
**ता. पनवेल, जि. रायगड**


# पनवेलमध्ये तरुणांना मिळणार रोजगाराच्या संधी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेत बारावी पास, आयटीआय, पदविका, पदवी व पदव्युत्तर युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहे. इच्छुक उमेदवारांनी पालिका मुख्यालयातील समाजविकास विभाग कार्यालय येथे संपर्क साधावा. जास्तीत जास्त उमेदवारांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे.

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत एमआयडीसी मधील विविध कंपन्यामध्ये डाटा एंट्री ऑपरेटर, शिपाई, सुपरवायझर या पदांसाठी, खासगी हॉटेल व कंस्ट्रशनमध्ये बारावी पास, पदवीधारक व हॉटेल व्यवस्थापन, आयटीआय, पदविका धारकांनी पालिका मुख्यालयातील समाजविकास विभाग कार्यालय येथे संपर्क साधावा अशी माहिती उपायुक्त रविकिरण घोडके यांनी केले आहे.

या योजनेत सहभागी होण्यासाठी उमेदवाराने या शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या संकेतस्थळावर नोंदणी करणे आवश्यक आहे. प्रशिक्षण पूर्ण केलेल्या उमेदवारांना संबंधित आस्थापनेकडून प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केल्याचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र देण्यात येईल. या योजनेच्या प्रशिक्षणानंतर प्रशिक्षण पूर्ण केलेले उमेदवार संबंधित उद्योग, आस्थापनांना योग्य वाटल्यास व उमेदवाराची इच्छुकता असल्यास त्यांना रोजगार देण्याच्या दृष्टीने संबंधित आस्थापना निर्णय घेऊ शकतील.

या योजनेंतर्गत प्रशिक्षण घेत असलेल्या उमेदवारांना किमान वेतन कायदा, राज्य कामगार विमा कायदा, कामगार भविष्यनिर्वाह निधी कायदा, कामगार नुकसान भरपाई कायदा व औद्योगिक विवाद कायदा लागू राहणार नाही. या कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत त्यांच्या शैक्षणिक अर्हतेप्रमाणे शासनामार्फत विद्यावेतन दिले जाईल.

# बँक ऑफ इंडिया रायगड विभागातर्फे ग्रामसभा



**रायगड : रामप्रहर वृत्त**

बँक ऑफ इंडिया एकात्मतेच्या संस्कृतीद्वारे राष्ट्राची समृद्धी या थीमसह देशभरात दक्षता जागरूकता सप्ताह पाळत आहे. या अंतर्गत रायगड विभागातील सर्व शाखांनी जिल्ह्यात वेगवेगळ्या ठिकाणी शुक्रवारी (दि.२०) ग्रामसभा आयोजित केली होती.

झोनल मॅनेजर मुकेश कुमार व डेप्युटी झोनल मॅनेजर बिरेन चॅटर्जी यांच्या मार्गदर्शनानुसार बँक ऑफ इंडिया रायगड झोनतर्फे विविध शाखांमध्ये शाखा व्यवस्थापकांनी ग्रामसभा आयोजित केल्या होत्या ज्यामध्ये ग्राहकांना फसवणुकीशी संबंधित माहिती देऊन जागरूक करण्यात आले.

बैठकीत ओटीपी शेअर करू नका, एटीएम पिन आणि सायबरलिंक शेअर करू नका त्याच बरोबर जास्त व्याज असणारे कर्ज घेऊन कर्जच्या विळख्यात अडकू नका, असे सांगण्यात आले. या वेळी ग्राहकांना कसे फसवले जाते याबाबत संबंधित माहिती देण्यात आली.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे / जमीन मालकांबरोबर बोलणी करून सदर मिळकत खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे डेरवली, ता. पनवेल, जि. रायगड**

| भोगवटादाराचे नाव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ. मी | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| पांडूरंग महादू शेळके | ८९/१/ब | ०-२४-०० | २.३२ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीवर मालक / भोगवटादार अशी नावे असलेल्या व्यक्ती म्हणजेच **पांडुरंग महादू शळके,** यांच्या नावाची नोंद आहे. तरी सदर वर वर्णन केलेल्या मिळकतीशी कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, वारसाहक्क, वहिवाट, साठेकरार, खरेदीखत, पोटगी, एम.ओ.यू. अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्या व्यक्तीने वर नमूद केलेल्या हक्काबाबत त्यांच्याजवळ असलेल्या योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदरची नोटीस वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झाल्यापासून **१५ (पंधरा)** दिवसाचे आत खालील पत्यावर लेखी हरकत घ्यावयाची आहे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत नोंदविली नाही तर, वर नमुद केलेला व्यवहार पुर्ण केला जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**पनवेल,**
**दिनांक :- २१/०९/२०२४**

**सही/-**
**अॅड. अतिश सुनील परदेशी**
**अॅड. हायकोर्ट**
**मोबा नं. ९७०२८९८९८९**
**गाळा नं. ७, फडके नाट्यगृह कॉम्प्लेक्स,**
**श्री समर्थ कृपा झेरॉक्स, पनवेल,**
**ता. पनवेल, जि. रायगड**


# पेणमध्ये ठिकठिकाणी साखरचौथ गणपतीची प्रतिष्ठापना



**पेण : प्रतिनिधी**

गणेशोत्सवाची जल्लोषात सांगता झाल्यानंतर शनिवारी (दि.२१) पहिल्या संकष्टी चतुर्थीला तालुक्यात ठिकठिकाणी सार्वजनिक आणि घरगुती साखरचौथ गणपतींची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे.

यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे मंडळातर्फे आयोजन करण्यात आले असून सर्वत्र मंगलमय असे पवित्र वातावातावरण निर्माण झाले आहे. पेणमध्ये अष्टविनायक मित्रमंडळ, ओरिजनल अष्टविनायक मित्रमंडळ, प्रेमनगर मित्रमंडळ चिंचपाडा, कवंडाळ तळ्याचा राजा, मातोश्री मित्र मंडळ, सुंदरनगर मित्रमंडळ, साई माऊली गणेशोउत्सव मंडळ नरदास चाळ, श्री गणेश उत्सव मंडळ कोळीवाडा, महाकाली मित्रमंडळ कासारआळी, शिक्षक सोसायटी मित्रमंडळ, चिंतामणी विश्वराज पिंपळपाडा, जय गणेश मित्रमंडळ बोरगाव, श्री मित्रमंडळ, न्यु यंग गणेश मंडळ, मित्रमंडळ दामुगुडे आळी, ओम श्री मित्रमंडळ विठ्ठल आळी, शिवसमर्थ मित्रमंडळ आबेघर, अष्टविनायक मित्रमंडळ गणपतीची वाडी, यंगस्टार शिवसमर्थ मित्रमंडळ आंबेघर, अष्टविनायक मित्रमंडळ गणपतीची वाडी, यंगस्टार मित्रमंडळ - रामवाडी, साखरचौथ ग्रामस्थ मंडळ इरवाडी आदी ठिकाणी सार्वजनिक मंडळासठ घरगुती सारखचौथ गणपतीची तालुक्यात प्रतिष्ठापना करण्यात आली आहे. त्यामध्ये पेण पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात ५५ सार्वजनिक व ८५ घरगुती साखरचौथ गणपतीची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे, तसेच वडखळ पोलीस ठाणे हद्दीत ६९ सार्वजनिक गणपती व २६ खासगी गणपती, दादर सागरी पोलीस ठाणे हद्दीत ५० सार्वजनिक व ९८ खासगी गणपती असून असे एकूण तालुक्यात १७४ सार्वजिनक व २०९ खासगी गणपतींची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे.

या गणेशोत्सवानिमित्त सर्वत्र भव्य मंडपे उभारण्यात आली असून विद्युत रोषणाईसह मनमोहक अशी सजावट करण्यात आली आहे. गणेशोत्सव शांततेने तसेच कायदा व सुव्यवस्थेचे पालन करून साजरा करण्याचे आवाहन पेण पोलीस निरीक्षक संदीप बागुल, वडखळ पोलीस निरीक्षक प्रसाद पांढरे यांनी केले आहे, तसेच कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी सर्वत्र चौक पोलीस बंदोबस्तदेखील ठेवण्यात आला आहे.

# बँक ऑफ इंडियात हिंदी महिना उत्साहात

**नवी मुंबई** : येथील बँक ऑफ इंडिया प्रबंधन विकास संस्थान येथे हिंदी महिना उत्साहात साजरा करण्यात आला.

संस्थानाचे प्राचार्य मनीष कर राय, कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत गृहमंत्री अमित शाह, बँक ऑफ इंडियाचे व्यवस्थापकीय आणि मुख्य कार्यकारी अधिकारी रजनीश कर्नाटक यांच्या संदेशांचे वाचन करण्यात आले. कार्यालयीन कामकाजात जास्तीत जास्त हिंदी भाषेचा वापर करण्याची प्रतिज्ञा सर्वांनी घेतली. संस्थानाचे प्राचार्य मनीष कर राय, उपप्राचार्य विजय कुमार जयस्वाल यांनी आपले विचार व्यक्त केले. हिंदी महिन्यात हिंदी टंकलेखन, बँकिंग शब्दावली स्पर्धा घेण्यात आल्या. विजेत्यांना पुरस्कार व प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार मुख्य व्यवस्थापक (राजभाषा) रमेश साखरे गच्छी यांनी व्यक्त केले.




## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे / जमीन मालकांबरोबर बोलणी करून सदर मिळकत खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे डेरवली, ता. पनवेल, जि. रायगड**

| भोगवटादाराचे नाव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ. मी | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| गजानन महादू शेळके उर्फ शेळका | ८९/१/अ | ०-२४-९० | २.३३ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीवर मालक/भोगवटादार अशी नावे असलेल्या व्यक्ती म्हणजेच **गजानन महादू शेळके उर्फ शेळका,** यांच्या नावाची नोंद आहे. तरी सदर वर वर्णन केलेल्या मिळकतीशी कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, वारसाहक्क, वहिवाट, साठेकरार, खरेदीखत, पोटगी, एम.ओ.यू. अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्या व्यक्तीने वर नमूद केलेल्या हक्काबाबत त्यांच्याजवळ असलेल्या योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदरची नोटीस वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झाल्यापासून **१५ (पंधरा)** दिवसाचे आत खालील पत्यावर लेखी हरकत घ्यावयाची आहे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत नोंदविली नाही तर, वर नमुद केलेला व्यवहार पुर्ण केला जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**पनवेल,**
**दिनांक :- २१/०९/२०२४**

**सही/-**
**अॅड. अतिश सुनील परदेशी**
**अॅड. हायकोर्ट**
**मोबा नं. ९७०२८९८९८९**
**गाळा नं. ७, फडके नाट्यगृह कॉम्प्लेक्स,**
**श्री समर्थ कृपा झेरॉक्स, पनवेल,**
**ता. पनवेल, जि. रायगड**





पनवेल : साखरचौथ गणेशोत्सवानिमित्त भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी ठिकठिकाणी विराजमान झालेल्या गणरायाचे मनोभावे दर्शन घेतले. त्यांचे स्वागत करण्यात आले. या वेळी पदाधिकारी, कार्यकर्ते, भाविक उपस्थित होते.





अचानक मित्र मंडळ, शिरढोणपाडा, पनवेल



डायमंड मित्र मंडळ, शिरढोण, पनवेल



मच्छिंद्र सुरेश म्हात्रे, पाले, उरण



उरण : चिर्ले येथील शिवकुमार मढवी यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाचे भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी दर्शन घेतले. या वेळी स्वयं मढवी, सानिया मढवी, सलोनी मढवी आदी उपस्थित होते.



पनवेल : कामगार नेते सुरेश पाटील यांनी आकुर्ली येथील गणेश पाटील यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाचे दर्शन घेतले.



ठिकरुळ नाका मित्र मंडळ, अलिबाग



पनवेल : करंजाडेच्या राजाची आरती करताना सरपंच मंगेश शेलार यांची टिपलेली छबी.



नितीन शेडगे, दिघाटी, पनवेल



अश्विन पाटील मित्र मंडळ, सातरहाटी, उरण



अनिल कुंदप, बाजारपेठ, उरण



श्री साईनाथ मित्र मंडळ, पनवेल



श्री गणेश भाजी विक्रेते सामाजिक विकास मंडळ, अलिबाग



श्री नवनाथ मित्र मंडळाचा राजा, परदेशी आळी, पनवेल



राजेश पाटील, उरण



श्रीबागचा राजा, अलिबाग



लाईन बॉईज्चा राजा, अलिबाग



मयंक परेश शेट्ये, मिरची गल्ली, पनवेल



चिरनेर कातळपाडा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, वशेणीकर आळी, उरण



चेंढरे ग्रामस्थ मंडळ, अलिबाग

# काही रिपीट रन भारीच गाजले...

अलबेला १९५१चा पिक्चर. सी. रामचंद्र यांच्या संगीतातील भोली सुरत दिल के खोटे, शोला जो भडके दिल मेरा धडके, श्याम ढले खिडकी तले ही गाणी हिट होता होता डॉ. भडकमकर मार्गावरील (तेव्हाचा लॅमिंग्टन रोड) इंपिरियल थिएटरमधील गर्दी वाढत वाढत गेली आणि मा. भगवान विलक्षण सुखावले. या चित्रपटाच्या यशाने मा. भगवान आणि अलबेला या यशाच्या एकाच नाण्याच्या दोन बाजू ठरल्या...

ही गोष्ट जुनी म्हणून तेथेच संपली असे अजिबात समजू नका. या चित्रपटाला साठ वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त याच इंपिरियल थिएटरमध्ये 'अलबेला'च्या खास खेळाचे आयोजन करून जवळच्याच एका हॉलमध्ये फिल्म दीवाने मनसोक्त गप्पांसाठी जमले.

...तर साठच्या दशकात अधूनमधून फक्त एका आठवड्यासाठी असे म्हणतच अलबेला एखाद्या चित्रपटगृहात प्रदर्शित होई. सत्तरच्या दशकाच्या मध्यास तर धमाल आली. चित्र खजिना या चित्रपट वितरण संस्थेच्या वतीने पुन्हा प्रदर्शित



केलेला अलबेला हाऊसफुल्ल गर्दीत एन्जॉय केला जावू लागला. एव्हाना रसिकांची बरीच पुढची पिढी आली होती. ती आणि मागची पिढी मिळून 'अलबेला'च्या गाण्यावर ताल धरू लागले. एकदा लोकप्रिय झालेली गाणी सर्वकालीन लोकप्रियच असतात. त्या काळात रेडिओ, लाऊडस्पीकर, इराणी हॉटेलमधील ज्युक्स बॉक्स, टेपरेकॉर्डर याच माध्यमातून गाण्यांचा प्रवास सुरू असे. 'अलबेला'ची गाणी त्याही पलिकडे पोहचली. गोपाळकाला, गणपती विसर्जन यातील कच्चीबाजात भोली सुरत दिल के खोटे सतत वाजत वाजत एका पिढीतून पुढील पिढीत जात राहिले आणि अलबेला रिपीट रनला येताच धो धो चालला. एकेक करत अनेक चित्रपटगृहात प्रदर्शित होत राहिला.

पिक्चरच्या दुनियेतील अशा काही रंजक व यशाच्या गोष्टी रसिकांची पिढी मुद्रित माध्यमातून डिजिटल युगात आली तसाच त्या गोष्टी यू ट्यूब चॅनेलपर्यंत प्रवास करताहेत. माहितीच्या स्फोटात हा रंग वेगळाच.

आज मल्टीप्लेक्समध्ये काही जुने (तेही फार जुनेही नाहीत हो) चित्रपट पुन्हा प्रदर्शित होत असतानाच ओरडून सांगावेसे वाटते, हे कल्चर तर साठ आणि सत्तरच्या दशकातील आणि त्यात काही चित्रपट तर रिपीट रनचे हुकमी.

मेरा नाम जोकर (१९७०) फर्स्ट डे फर्स्ट शोपासूनच पडला पडल्याची (की पद्धतशीर पाडला?) चा किस्सा कायमच गाजतो. दोन मध्यंतरचा जोकर आठवडाभरात एका मध्यंतरचा केला. काही आठवड्यातच जोकरची रिळे थिएटरमधून गोडाऊनमध्ये गेली (मुंबईत मेन थिएटर नॉव्हेल्टी), पण शो संपला नाही की थांबला नाही. काही वर्षातच जोकर कधी कुठे रिपीट रनला तर कुठे मॅटीनी शोला रिलीज होत होत रसिकांचा असा काही प्रतिसाद मिळवण्यात यशस्वी ठरला... सहज एक आठवण सांगतो. रणधीर कपूर दिग्दर्शित हीना (१९९१)चा मुंबईवरील आम्हा चित्रपट समीक्षकांसाठीचा खेळ आर. के. स्टुडिओतील मिनी थिएटरमध्ये आयोजित केला होता आणि शो संपल्यावर स्टुडिओतच पार्टी. त्या पार्टीत 'मेरा नाम जोकर'चा विषय निघताच रणधीर कपूर आम्हा सिनेपत्रकारांना म्हणाला, मेरा नाम जोकर हा आर.के. फिल्मच्या इतिहासातील सर्वाधिक उत्पन्न मिळवणारा चित्रपट ठरला. लोकांनी त्याला सुरुवातीस फ्लॉप म्हटलं, पण त्यानंतर जेव्हा जेव्हा रिपीट रनला जोकर रिलीज झाला तेव्हा उत्तम प्रतिसाद मिळवला... तेव्हा 'हीना'च्या समिक्षकेपेक्षा 'जोकर'च्या अशा यशाची बातमी मोठी होती.

रिपीट रन चित्रपटाच्या यशोगाथेत के. असिफ दिग्दर्शित मुगल-ए-आझम (१९६०) हा सर्वाधिक वेळा पुन्हा पुन्हा प्रदर्शित झालेला चित्रपट ठरावा. मला आठवतंय, सत्तरच्या दशकात मुंबईत तो सतत कुठे ना कुठे एका आठवड्यासाठी पुन्हा पुन्हा प्रदर्शित होत असे. मीदेखील असाच तो














रिपीट रनला नाझ चित्रपटगृहात प्रदर्शित झाला असता आवर्जून गेलो. तोपर्यंत त्याच्यावरील लेख वाचून वाचून तो डोळ्यासमोर होता. त्या काळातील मुद्रित माध्यमातून फ्लॅशबॅक, यादों की बारात, गुजरा हुआ जमाना, घुंघट के पट खोल, वो दिन याद करो अशा सदरांतून जुन्या चित्रपटांची चौफेर आणि भरपूर माहिती, वैशिष्ट्य वाचायला मिळत आणि त्यातूनच अनेक जुने चित्रपट कधी बरे पाहतोय असे होई.

चित्रपती व्ही.शांताराम दिग्दर्शित 'झनक झनक पायल बाजे' (१९५५) च्या रिपीट रनची गोष्ट खूपच वेगळी. हा चित्रपट फर्स्ट रननंतरही रिपीट रनला प्रदर्शित होत होताच आणि आशय, दिग्दर्शन व गीत संगीत व नृत्य क्लासिक असल्यानेच चित्रपटाला पुन्हा पुन्हा प्रतिसाद मिळत राहिला. अशातच ऐंशीच्या दशकाच्या मध्यास प्लाझाचे नूतनीकरण करण्यात आले आणि पुन्हा चित्रपटगृह सुरू करताना झनक झनक पायल बाजे प्रदर्शित करण्यात येताच रसिकांचा अतिशय उत्तम प्रतिसाद मिळाल्याने चित्रपटाने बरेच आठवड्यांचा मुक्काम केला. दर्जेदार कलाकृती कधीच कालबाह्य होत नसते, ती आपले सामर्थ्य रिपीट रनलाही दाखवून देतेच आणि झनक झनक पायल बाजे पुन्हा पुन्हा पाहणे कोणाला आवडणार नाही म्हणा.

नवीन शतकाच्या सुरुवातीस आधुनिक तंत्रज्ञानाने के. असिफ दिग्दर्शित 'मुगल-ए-आझम' (१९६०) रंगीत करून पुन्हा २००४च्या दिवाळीत थाटात रिलीज

झूम प्रहर



दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

करतानाही त्याची प्रिंट हत्तीवरून चर्चगेटच्या इरॉस थिएटरला आणली (५ ऑगस्ट १९६० रोजी मराठा मंदिर चित्रपटगृहातही अगदी अशीच ब्लॅक अॅण्ड व्हाईट 'मुगल-ए-आझम'ची प्रिंट हत्तीवरून आणली होती. त्या वेळेस चित्रपटातील देखण्या काचमहालातील मधुबालावरचे प्यार किया तो डरना क्या हे एकमेव नृत्य गीत रंगीत होते). आम्हा चित्रपट समीक्षकांना इरॉसच्या फर्स्ट डे फर्स्ट शोचे तिकीट दिल्याने मागील व पुढील पिढीसोबत पुन्हा मुगल-ए-आझम पाहिला. हा चित्रपट सत्तरच्या दशकापासून असंख्य वेळा रिपीट रनला प्रदर्शित झाला. मेहबूब खान दिग्दर्शित मदर इंडिया, विजय आनंद दिग्दर्शित गाईड, तिसरी मंझिल, राज खोसला दिग्दर्शित वो कौन थी, ओ.पी. रल्हन दिग्दर्शित फूल और पत्थर, यश चोप्रा दिग्दर्शित वक्त हे रिपीट रन वा मॅटीनी शोला वारंवार येत आणि चार-पाच वेळा पाहिलेले असले तरी पुन्हा पाहण्यासाठी थिएटरमध्ये जाणे होई.

मराठीत दादा कोंडके यांचे चित्रपट सर्वकालीन हिट पहिल्या रनला धो धो चालले तसेच रिपीट रनलाही त्यांना हाऊसफुल्ल गर्दी होत राहिली. अनेकदा तरी भारतमाता चित्रपटगृहावर जावे तर आंधळा मारतो डोळा, तुमचं आमचं जमलं, मला घेऊन चला असा दादांचा कोणता ना कोणता चित्रपट पुन्हा प्रदर्शित झाल्याचे दिसे आणि हमखास मनोरंजनाची हमी म्हणून तिकीट काढून आत जाऊन बसून मग फ्रेश होऊन बाहेर पडायचो.

रिपीट रन वा मॅटीनी शो चित्रपटांची वैशिष्ट्य अनेक. जंजीर, नमक हराम, दीवारच्या यशाने अमिताभ बच्चन नावाला वलय आणि वळण आले आणि त्याचे सुरुवातीचे संजोग, प्यार की कहानी, रास्ते का पत्थर, बंधे हाथ असे अनेक जुने चित्रपट आता रिपीट रनला प्रदर्शित केले. आता 'परवाना'च्या पोस्टरवर अमिताभ मोठा (त्यात तो खलपुरुष असतो) आणि नवीन निश्चल व योगिता बाली छोटे होते. पहिल्यांदा रिलीज होताना याच परवानाच्या पोस्टरवर अमिताभ कुठे तरी कोपर्यात असे वा नसेदेखील. यशाची हीच तर गंमत असते. ती अनेक समिकरणे/कधी नातेसंबंध बदलून टाकते.

आपल्या चित्रपटाचे जग अनेक प्रकारच्या लहान मोठ्या गोष्टीत रमलेले. राज खोसला दिग्दर्शित प्रेम कहानी आणि शक्ती सामंता दिग्दर्शित मेहबूबा या चित्रपटाना रसिकांनी नाकारले आणि खऱ्या अर्थाने राजेश खन्नाची सद्दी संपली. या चित्रपटाच्या पूर्वप्रसिद्धीत तो कायम म्हणायचा, माझे दिवस परत येतील, पण अमिताभचा सूडनायक तरुण पिढीला आपलासा वाटत होता. प्रेम कहानी व मेहबूबा दोन्हीची गाणी आजही लोकप्रिय. याचा फायदा काय झाला माहित्येय? हे चित्रपट रिपीट रन वा मॅटीनी शोला आले रे आले त्यातील गाणी पाह्यला हमखास गर्दी. दर्जेदार गीत संगीत चित्रपटाला कायमच पुढील पिढीत नेत राहते.

रमेश सिप्पी दिग्दर्शित 'शोले' हा रिपीट रनमध्येही विक्रमी. सत्तर एम.एममध्ये मिनर्व्हात अनेकांनी अनेकदा अनुभवला. रिपीट रनला पस्तीस एम.एममध्येही कुठे कुठे पाहिला. अनेक वर्षांनी त्यावर सोपस्कार करून तो थ्रीडी (त्रिमिती) करून मल्टीप्लेक्समध्ये प्रदर्शित केला. मी या तांत्रिक अनुभवासाठी आवर्जून जुहूच्या मल्टीप्लेक्समध्ये गेलो. गब्बरचा धाक कायम होता आणि आता पन्नासाव्या वर्षांत प्रवेश केल्याबद्दल रिगल चित्रपटगृहात एका खास खेळाचे आयोजन केले असता मी रिगलवर पोहचेपर्यंत शोले हाऊसफुल्ल. एक रसिक मला म्हणाला, थिएटरमध्येच मी शोले एकशेदहा वेळा पाहिला... ऐकून मला वाटलं, अशा फिल्म दीवान्यांनीच आपल्या देशात चित्रपट जगवला, वाढवला, जगवला. त्यांनी आपल्या देशातील चित्रपटावर निस्सीम प्रेम केले. शोले अनेकदा रिपीट रनला पडद्यावर आला आणि पुन्हा पुन्हा एन्जॉय केला गेला. एवढं 'शोले'त पाहण्यासारखे काय आहे असे म्हणणारे बरेच असले तरी त्यांचे ऐकतोय कोण?


रिपीट रन, मॅटीनी शोचा इतिहास खूपच रंजक व अनेक आठवणी, अनुभव असणारा. आज मल्टीप्लेक्सला नवीन चित्रपटांचा प्रवाह आटलाय म्हणून जुने चित्रपट प्रदर्शित होताहेत इतकेच. त्यापेक्षा प्रत्येक मल्टीप्लेक्समधील एक स्क्रीन फक्त आणि फक्त अगदी ब्लॅक अॅण्ड व्हाईट चित्रपटाच्या काळापासून ते २००० सालापर्यंतचे जुने चित्रपट पुन्हा प्रदर्शित करण्यासाठी ठेवावा. चित्रपट संस्कृतीत कायमच जुन्या चित्रपटांचे आकर्षण कायम राहिलयं. तो खेळ यापुढेही राहू देत...

# शिक्षण क्रांतीचे प्रणेते डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील

***सर्वसामान्य जनतेला***
***दिला जगण्याचा आधार,***
***स्थापून रयत शिक्षण संस्था***
***केला बहुजनांचा उद्धार***

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी आपल्या शैक्षणिक व सामाजिक कार्यातून महाराष्ट्रात अभूतपूर्व क्रांती घडवून आणली. संपूर्ण महाराष्ट्रात शिक्षणाचे जाळे निर्माण करून त्यांनी बहुजन समाजाला ज्ञानाची कवाडे उघडी केली. अशा या महामानवाच्या विचारांचा आणि कृतीचा वारसा जोपासण्याचे काम रयत शिक्षण संस्था गेली दहा दशके अखंडपणे करीत आहे.

रयतेमधूनी नव्या युगाचा माणूस आता घडतो आहे. वटवृक्षाच्या विशालतेचा मोह नभाला पडतो आहे या काव्यपंक्तीप्रमाणे पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांचे कार्य हे जगाच्या पाठीवरील महानतेचे प्रतिक आहे. महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज यांच्यापासून सामाजिक व शैक्षणिक कार्याची प्रेरणा घेऊन कर्मवीर अण्णांनी एक शैक्षणिक चळवळ उभी केली. केवळ आर्थिक परिस्थिती ठीक नाही, म्हणून सामान्य कुटुंबातील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून त्यांनी कमवा आणि शिका ही अभिनव योजना राबविली. वसतिगृहयुक्त शिक्षणातून जाती-पातीचा विचार मोडीत काढून समतेचे, एकसंघतेचे व धर्मनिपेक्षतेचे शिक्षण दिले. पिढ्यान्पिढ्या शिक्षणापासून वंचित झाल्यामुळे अज्ञान, अंधकारात ठेचाळणाऱ्या तसेच सामाजिक विषमता आणि जातीभेदात रुतून बसल्यामुळे चैतन्यहीन व अगतिक झालेल्या बहुजन समाजाच्या करूण किंकाळ्या ज्यांच्या अंतःकरणापर्यंत जाऊन पोहचल्या व त्या बहुजन समाजाचे अपमानित जीणे नष्ट करून त्यांना माणूस म्हणून स्वाभिमानाने जगता यावे यासाठी ज्यांनी आपल्या आयुष्यातील प्रत्येक क्षण नि क्षण आणि देहाचा कण न् कण चंदनाप्रमाणे झिजविला अशा भाग्यविधात्यांमध्ये ज्ञानोपासक डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे नाव उच्च ठिकाणी कोरले गेले आहे.



भाऊराव पाटील कर्मवीर कसे झाले या प्रश्नाचे उत्तर द्यायचे झाले तर मोठी माणसे काळाची निर्मिती असते. ही माणसे जन्म घेतात त्या वेळचा काळ, परिस्थिती, त्या व्यक्तीचे व्यक्तिमत्व, त्यांना घडविणारा, त्या व्यक्तीभोवती असलेले वातावरण यातूनच ती व्यक्ती घडत जाते, मोठी होत जाते.

आज २२ सप्टेंबर... थोर शिक्षणमहर्षी, समाजसुधारक कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३७वी जयंती. या युगपुरुषाचा जन्म पायगोंडा पाटील आणि गंगाबाई पाटील या दाम्पत्याच्या पोटी कुंभोज गावी अश्विन शुद्ध ५ ललित पंचमी या दिवशी म्हणजे २२ सप्टेंबर १८८७ या दिनी झाला. भाऊराव पायगोंडा पाटील यांच्या रूपाने एक देवदूतच जन्माला आला. त्यांनी बहुजन समाजाच्या मुलांना शिक्षणाची कवाडे खुली केली. वसतिगृहयुक्त शिक्षणाची व्यवस्था करून अठरापगड जातीच्या मुलांना सहजीवनाचा मंत्र दिला. देशाभिमान, देश कल्याण, देशभक्ती यासाठी एका समर्पित साधूत्वाचा जन्म होता तो.

कर्मवीरांचे प्राथमिक शिक्षण दहिवडी (विटा) या वडिलांच्या बदलीच्या गावी झाले. पुढील शिक्षणासाठी ते कोल्हापूरला आले. अण्णांच्या इंग्रजी शिक्षणाची सुरवात कोल्हापूरला प्रायव्हेट हायस्कूलमध्ये झाली. तिसरीपर्यंत शिक्षण घेतल्यानंतर ते राजाराम हायस्कूलमध्ये दाखल झाले. या वेळी अण्णा जैन बोर्डिंगमध्ये शिक्षण घेत होते. तेथील जुन्या चालीरीती व रूढी, परंपरा अण्णांना मानवल्या नाही. त्याविरुद्ध अण्णांनी आवाज उठविला. पुढे त्यांना छत्रपती शाहू महाराजांच्या राजवाड्यात राजाश्रय मिळाला. शाहू महाराजांच्या सहवासात कर्मवीरांवर समाजसुधारणेचे संस्कार दृढ झाले. पुढे त्यांनी कोल्हापूर शहराचा आणि शाहू महाराजांचा १९१० साली निरोप घेतला.

कर्मवीरांनी रयत शिक्षण संस्था ही निव्वळ शिक्षण देणारी संस्था उभी केली असे नव्हे; तर त्यांनी सामाजिक परिवर्तनाची एक प्रयोगशाळाच उभी केली. कराडजवळील काले या ठिकाणी सत्यशोधक समाजाची परिषद भरली होती. महाराष्ट्राच्या सर्व भागातील प्रतिनिधी या परिषदेस उपस्थित होते. ही परिषद ४ ऑक्टोबर १९१९ रोजी विजयादशमीच्या मुहूर्तावर घेतली गेली. पुण्याचे वकील केशवराव बागडे अध्यक्षस्थानी होते. भाऊराव पाटील बोलण्यास उठले. नुसत्या भाषणाने आणि परिषदांनी आपला बहुजन समाज सुधारेल असे मला वाटत नाही. बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी एक शिक्षण संस्था स्थापन करणे गरजेचे आहे. सूचना सर्व परिषदेत पसंत पडली. भाऊरावांनी त्या शिक्षण संस्थेस रयत शिक्षण संस्था नाव दिले. स्वतः कष्ट करून शेती पिकवणाऱ्या कष्टकऱ्याला रयत म्हणत. छत्रपती शिवाजी महाराजही आपल्या प्रिय प्रजेला रयत म्हणत. त्या दिवसापासून काले या ठिकाणी वसतिगृह सुरू करून रयत शिक्षण संस्थेच्या कार्याला प्रत्यक्षात सुरुवात झाली.

कर्ण लाजून विचारी माझी माऊली बघून अरे आभाळाएवढे हिला कुणी दिले मन? बहुजन समाजातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी पद्मभूषण डॉ. भाऊराव पाटील यांनी लावलेला वटवृक्ष प्रचंड वेगाने बहरतो आहे. त्यामध्ये रयतमाऊली सौ. लक्ष्मीबाई पाटील यांचा त्याग आणि समर्पण कधीही न विसरता येणारे आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत लक्ष्मीबाईंनी कर्मवीरांच्या शैक्षणिक कार्याला समर्थ साथ दिली. त्यांच्या कार्यासाठी आपल्या माहेरून मिळालेले सर्व प्रकारचे सुवर्ण अलंकार वसतिगृहाच्या खर्चासाठी देऊन टाकले. एवढेच नव्हे तर स्वतःचे मंगळसूत्रसुद्धा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कार्यासाठी दिले.

कर्मवीरांनी लावलेल्या शैक्षणिक रोपट्याचे रुपांतर आज वटवृक्षात झाले आहे. स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद असलेल्या अण्णांच्या शिक्षण प्रणालीत स्वाभिमान, समता, स्वावलंबन आणि श्रम प्रतिष्ठा या मूल्यांना मध्यवर्ती स्थान देण्यात आले. या असामान्य मूल्यांच्या आधारे, अभूतपूर्व शैक्षणिक कार्यामुळे महाराष्ट्रातील गोरगरीब, दलित समाजाचा चेहरामोहरा बदलला. शैक्षणिक प्रसाराबरोबरच आधुनिक काळाला उपयुक्त असणारे शिक्षण संस्थेमार्फत दिले जात आहे. कर्मवीरांचे महानिर्वाण ९ मे १९५९ रोजी झाले. साताऱ्याचा वटवृक्ष उन्मळून पडला. भाऊरावांनी इहलोकची यात्रा संपवली होती. शिक्षणाच्या माध्यमातून समाजजीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श करून ज्ञानगंगा झोपडीपर्यंत पोहचवणारे महामानव, सामान्य माणसांच्या जीवनात अभूतपूर्व कायापालट करून त्यांना माणूस म्हणून जगविण्याची संजीवनी देणारे रयत शिक्षण संस्थेचे द्रष्टे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील होते. त्यांच्यासाठी असेच म्हणणे योग्य ठरेल.

***त्या चार भिंतीवर विलसे दिव्य समाधी,***
***हा रयते पुरीचा राजघाट हो त्यागी,***
***ही मूर्ती देवो स्फूर्ती सतत विरागी,***
***स्वर्गस्थ सुरांची पुष्पवृष्टी दिनरात,***
***तो अमर जाहला कर्मवीर जगतात.***
***।। जय कर्मवीर ।।***

**-एच.एन. पाटील,**
उपशिक्षक, तु.ह.वाजेकर विद्यालय, फुंडे, उरण

# शिख धर्माचे संस्थापक गुरू नानक



शिख धर्माचे संस्थापक आणि शिखांचे पहिले गुरू नानक यांचा आज स्मृतीदिन. त्यांचा जन्म लाहोरजवळील रावी नदीच्या काठी वसलेल्या तलवंडी नावाच्या गावात झाला. काही विद्वान त्यांची जन्मतारीख १५ एप्रिल १४६९ मानतात, पण प्रचलित तारीख कार्तिक पौर्णिमा आहे, ती दिवाळीनंतर १५ दिवसांनी ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये येते. या गावाला आता ननकाना साहिब असे म्हटले जाते.

गुरू नानक यांच्या वडिलांचे नाव मेहता काळू जी, आईचे नाव तृप्त देवी होते. लहानपणापासूनच गुरू नानक यांनी धारदार बुद्धिमत्तेची चिन्हे दाखवायला सुरुवात केली. ते लहानपणापासूनच सांसारिक विषयांकडे दुर्लक्ष करायचे. त्यांनी आपला सर्व वेळ आध्यात्मिक चिंतन व सत्संगात व्यतीत केला. बालपणात अनेक चमत्कारिक घटना घडल्या, ज्यामुळे खेड्यातील लोकांनी त्यांना दैवी व्यक्तिमत्त्व म्हणून पहायला सुरुवात केली. लहानपणापासूनच त्यांचे आदरणीय असणाऱ्यांमध्ये त्याची बहीण नानकी आणि गावचे शासक राय बुल्यर हे प्रमुख होते. गुरू नानक यांचे लग्न वयाच्या सोळाव्या वर्षी गुरदासपूर जिल्ह्यातील लक्की नावाच्या रहिवासी असलेल्या मूळच्या कन्या सुलखानी यांच्याशी झाले. वयाच्या ३२व्या वर्षी त्यांचा पहिला मुलगा श्रीचंद याचा जन्म झाला. चार वर्षांनंतर दुसरा मुलगा लखमीदास याचा जन्म झाला. दोन्ही मुलांच्या जन्मानंतर १५०७मध्ये गुरू नानक यांनी मर्दाना, लहना, बाला आणि रामदास हे चार सहकाऱ्यांसह यात्रेसाठी निघून गेले.

गुरू नानक लहानपणापासूनच धार्मिक होते. ज्ञानप्राप्तीनंतर शीख धर्माच्या तत्वज्ञानाचा प्रचार व प्रसार करण्यासाठी त्यांनी देशभर यात्रा केली. जगभरातील धार्मिक स्थळांनाही त्यांनी भेटी दिल्या. सर्वसामान्यांमध्ये देव, धर्माबाबत जागृती निर्माण करण्यासोबतच त्यांनी शीख धर्माची शिकवण दिली. त्यांनी आयुष्यभर हिंदू व मुस्लिम धर्मियांना एकतेचा संदेश दिला. त्यांनी त्या काळात केवळ भारतभ्रमणच नव्हे; तर इराकमधील बगदाद आणि सौदी अरेबियात मक्का-मदिनेचीही यात्रा केली होती. अनेक अरब देश त्यांनी पालथे घातले.

गुरू नानक यांची मानवतावादावर दृढ श्रद्धा होती. त्यांचे चिंतन धर्माच्या सत्य व शाश्वत मुल्यांचे मूळ होते. म्हणूनच जात-धर्म या पलीकडे जाऊन सर्वांनी एकत्र यावे अशी त्यांची इच्छा होती. एकदा बेई नदीतून स्नान केल्यानंतर बाहेर आल्यावर त्यांनी 'कुणीही हिंदू नाही आणि कुणीही मुसलमान नाही, सर्व जण मानव आहोत', असा नारा दिला होता. हे जग बनविणारा एकच ईश्वर आहे, असे त्यांचे म्हणणे होते. धर्म हे दर्शन आहे, दिखावा नाही, अशी त्यांची धारणा होती. त्यासाठी अनेक केंद्राची साखळी निर्माण केली. त्यांनी एकता, श्रद्धा व प्रेमाचे तत्वज्ञान मांडले. ते क्रांतिकारी विचारांचे होते. त्यांनी नवीन विचारधारेचा प्रचार केला. (साभार : संतसाहित्य)

# विभागाच्या विकासाची जबाबदारी माझी -आमदार गोगावले

## ◆ राज्य महामार्ग ते कविळवहाळ कोंड रस्ता काँक्रीटीकरणाचे भूमिपूजन

**माणगाव : प्रतिनिधी**

संपूर्ण विभागाचा विकास करण्याची जबादारी तुमचा लोकप्रतिनिधी या नात्याने माझी असल्याचे प्रतिपादन आमदार भरत गोगावले यांनी माणगाव तालुक्यातील कविळवहाळ बु.येथील कार्यक्रमात बोलताना व्यक्त केले.



राज्य महामार्ग ६६ ते मुघावली कविळवहाळ खुर्द, कविळवहाळ बु., कविळवहाळ कोंड रस्ता काँक्रीटीकरण करणे रुपये ६,८१,६८ हजार अशा जवळपास सात कोटी रुपयांच्या कामांचा भूमिपूजन सोहळा शनिवारी (दि.२१) झाला.

या कार्यक्रमास राज्य शिवसेनेचे प्रवक्ते ॲड. राजीव साबळे, संपर्क प्रमुख अरुण चाळके, जिल्हा प्रमुख प्रमोद घोसाळकर, उपजिल्हा प्रमुख सुरेश महाडिक, युवा सेना जिल्हा प्रमुख विपुल उभारे, तालुका प्रमुख ॲड. महेंद्र मानकर, महिला आघाडी जिल्हाप्रमुख निलिमा घोसाळकर, पं. स. माजी सभापती महेंद्र तेटगुरे, तालुका महिला संघटिका अरूणा वाघमारे, माजी पं. स. सदस्य नथुराम करकरे, उद्योगपती प्रकाश टेंबे, सरपंच करिष्मा कदम आदींसह कविळवहाळ ग्रामस्थ तसेच कार्यकर्ते उपस्थित होते.

या वेळी आमदार भरत गोगावले पुढे म्हणाले की, आम्ही जो शब्द देतो तो पूर्ण करतो. आम्ही पाच वर्षे तुम्ही सांगाल ती कामे करीत असतो. महायुतीतून आपण विधानसभेची निवडणूक लढणार असून सर्वांनी हातात हात घालून काम करूया, असे आवाहन त्यांनी केले.

# वासरू चोरण्याचा प्रयत्न; आरोपी अटकेत

**चौक** : नानिवली गावातील एका शेतकऱ्याचे लहान वासरू चोरण्याचा प्रयत्न झाला, मात्र पोलिसांनी दोन्ही आरोपींच्या मुसक्या आवळल्या आहेत.

नानिवली गावात सायंकाळी अंधार पडायला सुरुवात झाल्यावर रिक्षा (एमएच ४६ एझेड ५२८५)मधील चालक दिनेश पाटील व रिक्षात असलेला सचिन कातकरी (रा.पनवेल) यांनी शेतकऱ्याचे लहान वासरू बळजबरीने रिक्षात कोंडून चोरून नेले. ही माहिती मिळताच स्थानिकांनी रिक्षाचा पाठलाग केला. या दोन्ही आरोपींच्या मुसक्या आवळल्या आहेत. याबाबत खालापूर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



## निवडक

### गिरिजनवाडी शाळेत साहित्य वाटप



**माणगाव** : सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त युवा मोर्चा व राजलक्ष्मी रचना निलेश थोरे हिच्या सौजन्याने नगरपंचायत प्रभाग क्र. ४ उतेखोल गिरिजनवाडी शाळेतील शालेय विद्यार्थ्यांना दप्तर व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास अलिबाग पं.स. माजी सदस्य रचना थोरे, नगरसेविका ममता थोरे, केंद्रप्रमुख शंकर शिंदे, उणेगाव ग्रामपंचायत सदस्य सचिन सत्वे, राकेश जाधव, राजश्री जाधव, रुपाली कासारे, कुमुद जाधव, युवा मोर्चा उपाध्यक्ष मंदार मढवी, प्रगती लांगे, वैशाली मढवी, कुसुम कदम, अंकिता पांगसे, शालिनी जठार, शिक्षिका शीतल नागे व विद्यार्थी उपस्थित होते.

### कौशल्य विकास केंद्राचे उद्घाटन



**रोहे** : श्रीमती गीता द. तटकरे तंत्रनिकेतनमध्ये आचार्य चाणक्य कौशल विकास केंद्राचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे झाले. या वेळी संस्थेचे विद्यालयात विश्वस्त संदीप तटकरे, कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागाचे समन्वयक नेताजी खडगावे, रजिस्टर अजित तेलंगे, प्राचार्य विपुल मसाल, नानासाहेब धर्माधिकारी कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास देशमुख, आयटीआय केंद्राचे प्राचार्य संजय हजारे आदी उपस्थित होते.




**नागोठणे : ज्येष्ठ पत्रकार कै. विजय देशपांडे यांच्या निवासस्थानी विराजमान झालेला साखरचौथच्या गणरायाचे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते भाई टके, रायगड जिल्हा पत्रकार संघ उपाध्यक्ष नागेश कुलकर्णी, नागोठणे ग्रामीण विभाग पत्रकार असोसिएशनचे संस्थापक शामकांत नेरपगार, अध्यक्ष ॲड. महेश पवार, सचिव अनिल पवार, पत्रकार नंदू देशपांडे व मंदार कुलकर्णी यांनी दर्शन घेतले.**

# कलोते ग्रामपंचायतीचा कचरा महामार्गावर

## पळस्पे केंद्राच्या उपनिरीक्षकांनी बजावली नोटीस

**खालापूर : प्रतिनिधी**

कलोते ग्रामपंचायत हद्दीतील मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गालगत उघड्यावर कचरा टाकत असल्याने मोकाट गुरांचा वाढलेला वावर अपघाताला निमंत्रण देत आहे. याबाबत महामार्ग पोलीस पळस्पे केंद्राचे उपनिरीक्षक वैभव रोंगे यांनी ग्रामपंचायतीला नोटीस बजावली आहे.



कलोते ग्रामपंचायतीची मुंबई-पुणे महामार्गालगत असलेल्या कालव्यालगत गावठाण जागा आहे. या जागेत डम्पिंग ग्राऊंड तयार करण्यात आले आहे. ग्रामपंचायत हद्दीतील हॉटेल, ढाबे, फार्महाऊस तसेच नागरी वस्तीतील कचरा या ठिकाणी आणून टाकला जातो.

कचऱ्याचे कोणत्याही प्रकारचे वर्गीकरण न करता कचरा उघड्यावर टाकण्यात येतो. प्लास्टिक पिशव्या, खराब अन्नपदार्थ, सडलेला भाजीपाला याशिवाय विविध प्रकारचा कचरा जमा होत असल्याने गुरेढोरे, श्वान कचरा खाण्यासाठी गर्दी करतात. डम्पिंग ग्राउंडला कोणत्याही प्रकारचे संरक्षक भिंत नसल्याने गुरांचा वावर यामुळे एनएमएमटी बसचा अपघात याठिकाणी घडला होता.

या घटनेनंतर कलोते ग्रामपंचायतीने कचरा विल्हेवाट योग्यरितीने लावण्यासाठी महामार्ग पोलीस पळस्पे यांनी नोटीस बजावली आहे. कचरा विल्हेवाट करण्यासाठी योग्य उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

# अपंग चंदर आवटे यांना मदतीचे आवाहन

**मोहोपाडा** : आदिवासी ठाकूर समाजाचे मोरबे धरण क्षेत्रातील पोखरवाडी येथील चंदर दामा आवटे यांचा काम करीत असताना दोन्ही पायांना दुखापत होऊन अपंग झाल्यामुळे त्यांचा रोजीरोटीचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे त्यांना मदतीचे आवाहन करण्यात आले आहे.

त्यांना चालता येत नसल्यामुळे ते कोणताही व्यवसाय करू शकत नाही. त्यांनी याबाबत स्थानिक नेत्यांना अपंग असल्यामुळे अपंगाची गाडी मिळावी यासाठी विनंती केली होती, परंतु त्यांना कोणीही मदत केली नाही. त्यांना मदत मिळावी, अशी त्यांची इच्छा असून (८६६९९३७६१३) या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी केले आहे.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी (१) निर्मला उर्फ विमल ज्ञानेश्वर तांबोळी, (२) मयत कै. रुक्मिणी कृष्णा पाटील उर्फ रुक्मिणी किसन पाटील यांचे वारस व उत्तराधिकारी (अ) किरण किसन पाटील, (ब) साजन किसन पाटील, (क) शैलजा हिरालाल घरत आणि (ड) विजय किसन पाटील यांचे वारस व उत्तराधिकारी (i) देवयानी विजय पाटील, (ii) प्रितम विजय पाटील, (iii) जुईली विजय पाटील, (३) कमळा संतुराम म्हात्रे, (४) नारायण संतुराम म्हात्रे, (७) गोविंद संतुराम म्हात्रे, (६) अनंत संतुराम म्हात्रे, (७) मयत कै. जनाबाई पांडूरंग म्हात्रे, (८) मयत कै. अहिल्या पांडूरंग म्हात्रे, (९) मयत कै. रोहीदास पांडूरंग म्हात्रे क. ७ ते ९ यांचे वारस व उत्तराधिकारी (अ) उर्मिला रोहिदास म्हात्रे, (ब) विकम रोहिदास म्हात्रे, (क) अक्षया अक्षय पाटील, (१०) गणेश पांडूरंग म्हात्रे, आणि (११) लताबाई माणिक पाटील यांच्याकडून त्यांच्या मालकी हक्कातील भोगवटादार वर्ग २ खाली नमुद करण्यात आलेली मौजे चाणजे, ता. उरण, जि. रायगड येथील जमिन मिळकत कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्या जमिन मिळकतीचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे :-

### मिळकतीचे वर्णन

| भुमापन क. /उपविभाग क. | क्षेत्रफळ (हे. आर. चौ. मी.) | | | आकार |
|---|---|---|---|---|
| | जिरायत | लागवडीस अयोग्य | एकूण क्षेत्र | रु. पैसे |
| ३७२/१ | ० - ०७ - ६० | ० - ०० - ५० | ० - ०८ - १० | १.५६ |
| ३६७/२ | ० - १९ - ५० | ० - ०३ - ६० | ० - २३ - १० | ४.३७ |
| ३६७/४ | ० - ०४ - ६० | ० - ०१ - ०० | ० - ०५ - ६० | १.०६ |
| ३६७/१३ | ० - ०२ - ५० | - | ० - ०२ - ५० | ०.५३ |

तरी या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, वरील जमिन मिळकतींसंदर्भातील साठेकरार/खरेदीखत हे आमचे अशिल आणि वर उल्लेखित जमिन मालक/भोगवटादार यांच्यामध्ये करण्यात येणार आहे त्यापुर्वी सदरच्या मिळकत हया निर्वेध, बिनकर्जी, बोजारहित व निजोखमी असणे आवश्यक आहे त्याकरिता जर वरील नमुद केलेल्या मिळकतींवर अन्यथा कोणाचाही कोणत्याही प्रकाराचा हक्क, हितसंबध असल्यास लेखी पुराव्यानिशी अन्य तपशिलासह की जो पुरावा म्हणून पुरेसा ठरेल तसेच कागदोपत्री पुरावा खाली सही करणा-याकडे त्याच्या कार्यालयात ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून पंधरा (१५) दिवसांच्या आत सादर करावे, आणि जर तसे केले नाही तर असे गृहित धरण्यात येईल की, सदरच्या जमिन मिळकती हया सर्व प्रकारच्या बंधनातून आणि अन्य हक्कांपासून आणि अधिकारांपासून मुक्त आहे आणि तसे जर काही हक्क असतील तर ते सोडून देण्यात आले आहेत असे मानण्यात येईल. परंतु दिलेल्या पंधरा (१५) दिवसांच्या मुदतीनंतर कोणतेही हक्क, हरकती आल्याच तर त्याचा विचार न करता माझे अशिल हे सदर जमिन मिळकत कायमस्वरुपी खरेदी करण्याच्या दृष्टिने कार्यवाही करतील याची नोदं घ्यावी.

**सही/-**
**धनंदा प्रदिप मोकल**
(उच्च न्यायालय वकील)

पत्ता : शॉप नं. १४, शिव चेंबर, प्लॉट नं. २१, सेक्टर-११, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई, ता. आणि जि. ठाणे. फोन नं. ९६१९५०५९५८

# वरसेत विकासकामांचे भूमिपूजन व उद्घाटन

## खासदार सुनील तटकरे यांची प्रमुख उपस्थिती

**धाटाव : प्रतिनिधी**

खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते रोहा तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत वरसे हद्दीतील विविध विकासकामांचे भूमिपूजन व उद्घाटन सोहळा शुक्रवारी (दि. २०) उत्साहात सोहळा पार पडला.

वरसे बसस्टॉप व अंतर्गत रस्त्याचे उद्घाटन, निवी अंतर्गत गटार व रस्ता तयार करणे भूमिपूजन, शिवलकर ते देशमुख यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करणे, दीपक पाटील ते थळे व घाणेकर रस्ता तयार करणे, वैभव नगर अंतर्गत गटावर तयार करणे, राम करंजे ते वैरागी मिल गटार बांधणे, वरसे ग्रामपंचायत अंतर्गत सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे, एकता नगर भुवनेश्वर गार्डन भिंत उद्घाटन, कै. मारुती भिकू पाटील सभागृह सुशोभिकरण, निरलान कॉलनी ते शंकर मंदिर रस्ता तयार करणे, घाणेकर ते शेटके रस्ता तयार करणे, सदासयोग लक्ष्मी मंदिर सुशोभिकरण, रंगतरंग ते वरसे पोस्ट ऑफिसपर्यंत रस्ता करणे या कामांचा शुभारंभ करण्यात आला.

खासदार तटकरे यांनी, वरसेमध्ये आज राज्य शासनाच्या नवनवीन योजनांमुळे वस्तीसुद्धा वाढत आहे. उद्योगमंत्री उदय सामंत यांनी माझ्या विनंतीला मान देऊन धाटाव, वाशी, तळाघर व वरसे येथे अनेक विकास कामे केली जात आहे. वरसे परिसरातील नागरिकांशी गेल्या अनेक वर्षापासून ऋणानुबंध आहेत, असे प्रतिपादन केले. या वेळी राष्ट्रवादी रोहा तालुकाध्यक्ष विनोद पाशिलकर, सरपंच अमित मोहिते, नरेश पाटील, रामचंद्र नाकती, दिपीका चिपळूणकर, प्रतिमा पाटील, शंकर भगत, अनिल भगत यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



# वाहतूक पोलिसांची धडक कारवाई

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्यांची संख्या वाढली आहे. त्यामुळे अपघातांचे प्रमाणही वाढले आहे. या पार्श्वभूमिवर वाहतूक पोलिसांनी अशाप्रकारे बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्या वाहनचालकांवर धडक कारवाई केली आहे.

जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शुक्रवारी (दि.२०) वाहतुकीचे नियमभंग करणाऱ्या एकूण २०३ चालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून एक लाख ९९ हजार ७०० रुपये इतका दंड आकारला आहे.



### रेवदंड्याचा राजा

**रेवदंडा : येथे रेवदंडा मित्रमंडळ आयोजित साखरचौथ गणेशाची प्रतिष्ठापना जल्लोषात करण्यात आली. रेवदंड्याचा राजा म्हणून प्रसिद्ध असलेल्या साखरचौथ गणेशाच्या दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली होती.**

मा: काकडे साहेबांचे कोर्ट

**ॲड. विनायक अं. कोळी,**
**अर्जदारा तर्फे वकील**

**वारस दाखला मिळणे कामी जाहीरनोटीस**
**पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधीश साहेब (व. स्तर) यांचे कोर्टात**

**पु.ने.ता. २२/११/२०२४**
**नि.०८/ड**
**दिवाणी चौकशी अर्ज १२६३/२०२४**

श्री हरिओमकुमार दयाशंकर तिवारी व इतर...... अर्जदार
विरुद्ध
कुणीही नाही............... सामनेवाला

ज्या अर्थी श्रीमती शिवदेवी दयाशंकर तिवारी, यांचे निधन दिनांक २२/१०/२०२१ रोजी एम.जि.एम. हॉस्पिटल, कामोठे येथे झाले आहे आणि अर्जदार श्री हरिओमकुमार दयाशंकर तिवारी, श्री शिवओम कुमार दयाशंकर तिवारी, श्री दयाशंकर रामशिरोमणी तिवारी सर्व रा.११०३, इंपीरीयल हाईट्स को.हौ.सो., प्लॉट नं.२३१, सेक्टर २१, कामोठे, ता. पनवेल. पिनकोड ४१०२१८ यांनी या कोर्टामध्ये सदरहू मयत श्रीमती शिवदेवी दयाशंकर तिवारी यांचे अर्जदार हे कायदेशीर वारस असल्याचे प्रमाणपत्र मिळावे म्हणून अर्ज केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार या मयताचे कायदेशीर वारस नव्हे असे कोणास समजाविण्याचे असेल तर ह्या जाहीर नोटीसीचे तारखे पासून एक महिन्याचे आत, त्याने या कोर्टात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते कि, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार ह्यांचे हक्का बद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयत श्रीमती शिवदेवी दयाशंकर तिवारी यांचे अर्जदार क्र. १ ते ३ हे कायदेशीर वारस असल्याचे प्रमाणपत्र देईल.

**मयत यांची स्वकष्टार्जित मिळकतिचे वर्णन पुढील प्रमाणे : -**

१. फ्लॅट नं. १०६, पहिला माळा, प्रगती एनक्लेव्ह को.हौ.सो.मर्या., प्लॉट नं. ५०, सेक्टर ५, उलवे नोड, ता. पनवेल, जि. रायगड, मिळकतीचे क्षेत्र २७.५०० चौ.मी. कारपेट ३.५३७ चौ.मी. टेरेस, खरेदी मोबदला रु. वीस लाख मात्र (रु.२०,००,०००/-), खरेदी दस्त क्र.२३०३/२०१५ शेअर्स सरटीफिकेट क्र. ६.

२. फ्लॅट नं. १०४, ए विंग, आशिष को.हौ.सो. मर्यादित, प्लॉट नं. २७ए, सेक्टर ३, नवीन पनवेल (पु.), ता. पनवेल, जि. रायगड, मिळकतीचे क्षेत्र ४५० चौ.फू बिल्ड अप क्षेत्रा पैकी ५०% हिस्सा, खरेदी मोबदला रु. चार लाख पन्नास हजार मात्र (रु. ४,५०,०००/-), पैकी ५०% हिस्सा, खरेदी दस्त क्र. ६७८१/२००६, शेअर्स सर्टिफिकेट क्र. ८

**दिनांक : २१/०९/२०२४**

**सही/-**
**क. लिपीक**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**दि.न्या. (व. स्तर) पनवेल**

जा.क्र. १३३/२४-२५

## ग्रुप ग्रामपंचायत गुळसुंदे

ता. पनवेल, जि. रायगड

**जाहीरात सूचना क्र. २ सन २०२४/२५**

दिनांक २०/०९/२०२४

ग्रुप ग्रामपंचायत गुळसुंदे, ता. पनवेल, जि. रायगड हे गुळसुंदे ग्रामपंचायत हद्दीतील पुढील विकास कामाच्या अंमलबजावणी करिता सिलबंद निविदा मागवीत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम ठराव नं./ मा.स. दि. | इसारा १% रक्कम (ना परतावा) | निविदा फॉर्म फी | निविदा स्विकारण्याची अंतिम तारीख | काम पूर्ण करण्याचा कालावधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | गुळसुंदे येथे डम्पिंग ग्राउंडे | रु.७१८०५/- मा.सभा ०८/०८/२०२४ ठराव नं. ३८/५ | ७१८/- | २००/- | ०१/१०/२०२४ | १ महिना | १५ वा वित्त २२-२३ चे काम Second Call |
| २ | पलाटवाडी येथे पेवर ब्लॉक बसविणे. | रु.१८५४७०/- मा.सभा ०८/०८/२०२४ ठराव नं. ३८/४ | १८५४/- | ५००/- | ०१/१०/२०२४ | १ महिना | १५ वा वित्त २३-२४ चे काम Second Call |
| ३ | गुळसुंदे दिपक पारंगे ते मिलिंद भोजने पर्यंत गटार बांधणे. | रु.१४१४२५/- मा.सभा ०८/०८/२०२४ ठराव नं. ४३/१६ | १४१४/- | ५००/- | ०१/१०/२०२४ | १ महिना | १५ वा वित्त २३-२४ चे काम |
| ४ | गुळसुंदे, आकुळवाडी, लाडीवली अंगणवाडी दुरुस्ती करणे. | रु.६००००/- मा.सभा ०८/०८/२०२४ ठराव नं. ४३/१७ | ६००/- | २००/- | ०१/१०/२०२४ | १ महिना | १५ वा वित्त २२-२३ चे काम |
| ५ | लाडीवली आदिवासीवाडी येथे समाज मंदिर बांधणे. | रु.१५३४१२/- मा.सभा ०८/०८/२०२४ ठराव नं. ४३/१८ | १५३४/- | ५००/- | ०१/१०/२०२४ | १ महिना | १५ वा वित्त २१-२२ चे काम |
| ६ | अंगणवाड्याना रेनवॉटर हार्वेस्टिंग करणे. | रु.२१२१४९/- मा.सभा ०८/०८/२०२४ ठराव नं. ४३ (३२) | २१२१/- | ५००/- | ०१/१०/२०२४ | १ महिना | १५ वा वित्त चे काम |
| ७ | रा.जि.प प्राथमिक शाळांना रेनवॉटर हार्वेस्टिंग करणे. | रु.३५३५६१/- मा.सभा ०८/०८/२०२४ ठराव नं. ४३ (३१) | ३५३५/- | ५००/- | ०१/१०/२०२४ | १ महिना | १५ वा वित्त चे काम |

१. निविदा मिळणेकरिता दि. २३/०९/२०२४ ते २५/०९/२०२४ पर्यंत लेखी अर्ज/नोंदनिकृत ठेकेदाराने सादर करणे.
२. ठेकेदारांना कोरे निविदा प्रपत्र दिनाक २६/०९/२०२४ ते ३०/०९/२०२४ (सुट्टीचे दिवस वगळता) ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध होतील.
३. (१) १% इसारा रक्कम (२) ठेकेदार नोदणी प्रमाणपत्र (३) GST पत्र व इतर सोबत जोडलेली सिलबंद निविदा दि.०१/१०/२०२४ रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत स्वीकारण्यात येतील.
४. दि. ०१/१०/२०२४ रोजी दुपारी १.०० वाजता समक्ष उघडणेत येतील.
५. म. ग्रा. पं लेखासहिता २०११ कलम ४५ (२) अन्वये विकास काम first call कमीतकमी ३ नोंदणीकृत ठेकेदार, तेच काम Second Call ३ नोंदणीकृत ठेकेदार, तेच काम Third Call २ नोंदणीकृत ठेकेदार, तेच काम Fourth call १ नोंदणीकृत ठेकेदार, वैध असेल.
६. ईसारा रक्कम डिमांड ड्राफ्टने स्वीकारण्यात येईल. डिमांड ड्राफ्ट सरपंच ग्रामपंचायत गुळसुंदे यांचे नावे असावा (अथवा चेकने) चेक ठेकेदाराकडून आलेला असणे आवश्यक आहे.
७. ज्या ठेकेदाराची निविदा मंजूर केली जाईल त्यास इसारा रक्कम परत केली जाणार नाही.
८. सदर कामाचे अदाज पत्रक कार्यालयीन वेळेस पहावयास मिळेल.
९. निविदा पोस्टाने पाठवली जाणार नाही व दिलेल्या तारीख व वेळेपेक्षा उशिरा आलेल्या निविदा स्वीकारली जाणार नाही.
१०. निविदा फॉर्म किमत नापरतावा राहील.
११. कामाच्या बिलातून ५% सुरक्षा अनामत, २% आयकर, २% GST १% लेबर इन्सुरन्स, १% उपकर कपात केली जाईल.
१२. २ %GST ग्रा. प. कट करील तर १६% GST संबधीत नोंदणीकृत ठेकेदारांनी शासनास भरणा करणे बंधनकारक आहे.
१३. ज्या ठेकेदाराकडे GST नंबर नसेल त्यांच्या कडून जादा ५% GST कट करून घेण्यात येईल.
१४. वर्क ऑड़र प्रमाणे मुदतीत काम पूर्ण न केल्यास दुसऱ्या ठेकेदाराकडून ग्रामपंचायतीचे काम करून घेतल्यास होणाऱ्या खर्चास तसेच कायदेशीर कारवाईस संबधितास जबाबदार राहावे लागेल
१५. झालेल्या तात्रिक मूल्यांकनाप्रमाणे व निधी उपलब्ध ते नुसार देयके अदा केली जातील. (अदाजपत्रकीय रकमेपेक्षा जास्त नाही तसेच कमी दराची रक्कम देय असेल)
१६. निविदा मंजूर केल्यास ४ दिवसात काम सुरु करणे बंधनकारक आहे.
१७. मंजूर काम पनवेल पंचायत समिती बांधकाम विभाग तांत्रिक अधिकारी JE यांच्या मार्गदर्शनानुसार व ग्रामपंचायत देखरेखीखाली करायचे आहे.
१८. निविदा मंजूर केल्यावर रु. ५००/- चे स्टॅम्प पेपरवर दोन जामीनदारदेवून करारनामा स्वखर्चाने करून घ्यावा लागेल.
१९. सुरक्षा अनामत रक्कम अतिम बिलाचे ६ महिने पर्यंत ग्रामपंचायतीकडे जमा राहील. केलेल्या कामाचा दर्जा चांगले असल्याची ग्रामपंचायतीची खात्री झाल्यावर मागणी नुसार सुरक्षा अनामत परत केली जाईल.
२०. काम पूर्ण करणे पूर्वीचा कामाचे ठिकाणाचे फोटो व काम पूर्ण झाल्यावर कामाचे फोटो दिल्याशिवाय अतिम बिले दिली जाणार नाही.
२१. सोबत दिलेल्या तात्रिक मान्यतेच्या आदेशातील अटी व शर्तीप्रमाणे काम करण्याचे आहे
२२. निविदा धारकाकडे पॅन असणे गरजेचे आहे.
२३. निविदा ओपनिंगच्या दिवशी संबंधित नोंदणीकृत ठेकेदार हजर असणे आवश्यक आहे.
२४. अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराची निविदा अस्विकृत राहील.
२५. बांधकाम पूर्ण झाल्यावर नियमाप्रमाणे कामाचे नावाचा बोर्ड बसविणे बंधनकारक आहे.
२६. ठेकेदारणे केलेल्या कामाबाबत लेखापरीक्षणात त्रुटी आढळून आल्यास संबधित ठेकेदाराला जबाबदार धरण्यात येईल.
२७. कमीत कमी दराची निविदा मंजूर करणे बाबत विचार करण्यात येईल / नोंदणीकृत ठेकेदाराला प्राधान्य राहीले
२८. एक किवा सर्व निविदा ना मंजूर करणेचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.
२९. आकस्मित एखादे काम रद्द करणेचा सार्वजनिक निर्णय झाल्यास भरलेली निविदा फी परत मिळणार नाही.
३०. एखाद्या कामाची निविदा लिफाफा ३ पेक्षा कमी आल्यास संबधित ठेकेदारांनी ओपन करू नका असा आग्रह धरल्यास सदरचा लिफाफा ओपन न करण्याबाबत विचार केला जाईल.

**सही/-**
**रामदास दासगांवकर**
**ग्रामविकास अधिकारी,**
**ग्रुप ग्रामपंचायत गुळसुंदे**

**सही/-**
**मिनाक्षी भास्कर जगताप**
**सरपंच,**
**ग्रुप ग्रामपंचायत गुळसुंदे**

## निवडक



### युईएस कॉलेजमध्ये हिंदी दिवस

**उरण :** हिंदी दिवसाचे औचित्य साधून गुरुवारी (दि.१९) उरणमधील युईएसच्या स्कूल व ज्युनिअर कॉलेज विभागातील विद्यार्थ्यांनी हिंदी दिवस उत्साहात साजरा केला. हिंदी दिवसानिमित्त ज्युनिअर कॉलेजच्या विदयार्थ्यांनी कविता वाचन व श्रुतलेखन केले, तर माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांनी समूह गीत सादर केले तसेच काही विद्यार्थी व शिक्षकांनी हिंदीत भाषणेही केली. माध्यमिक विभागाच्या विद्यार्थ्यांसाठी तसेच प्राथमिक विभागाच्या चौथी व पाचवी इयत्तेच्या विद्यार्थ्यांसाठी हस्तलेखन स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले होते.

### रक्तदान व आरोग्य तपासणी शिबिर

**नवीन पनवेल :** श्री प्रल्हाद राय झुलेलाल ट्रस्ट, श्री पूज्य सिंधी पंचायत ट्रस्ट, पनवेल नवी मुंबई प्रिंट आणि डिजिटल पत्रकार संघटना आणि आम्ही रक्तदाते पनवेलचे यांच्यातर्फे रक्तदान शिबिर व मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. श्री पूज्य सिंधी पंचायत झुलेलाल मंदिर, विश्राळी नाका, पनवेल येथे रविवारी (दि.२२) सकाळी नऊ ते दुपारी तीन वाजेपर्यंत हे शिबिर होणार आहे. या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन अ‍ॅड. मनोहर सचदेव यांनी केले आहे.

### तीर्थदर्शन योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

**पनवेल :** मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेचा शासन निर्णय जारी करण्यात असून ६० वर्षांवरील नागरिकांना योजनेचा लाभ घेता येणार आहे. या योजनेचा लाभ घेण्याचा पात्र लाभार्थ्यांना प्रती व्यक्ती प्रवास खर्चाची कमाल मर्यादा ३० हजार इतकी असणार आहे. महानगरपालिका कार्यक्षेत्रातील ज्येष्ठ नागरिकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे. पुण्यकर्म म्हणून तीर्थक्षेत्री जाण्याची सर्वसामान्य कुटुंबातील नागरिकांना असते, परंतु त्यांच्या आर्थिक परिस्थितीमुळे पुरेशी माहिती नसल्याने यात्रा करता येत नाही. हेच स्वप्न पूर्ण करण्यासाठी शासनाने पुढाकार घेतला आहे. मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेचा लाभ घेण्यासाठी पालिका मुख्यालयातील समाजविकास विभाग कार्यालय येथे संपर्क साधावा, अशी माहिती उपायुक्त रवीकिरण घोडके यांनी केले आहे.

# सणाचे दिवस संपताच मासळी खरेदीसाठी गर्दी

## सुमारे ३० ते ४० प्रकारचे मासे उपलब्ध



**उरण : रामप्रहर वृत्त**

गणेशोत्सवात उपवासाचे दिवस संपताच उरणच्या मासळी बाजारात खरेदीसाठी खवय्यांची गर्दी होण्यास सुरुवात झाली आहे. गणपती उत्सव व त्यापूर्वी श्रावण महिना सुरू होता. त्यामुळे अनेकांचे उपवासाचे दिवस सुरु होते, मात्र हे उपवास अनंतचतुर्दशीला संपले आहेत. त्यानंतर खवय्यांची मासळी खरेदीसाठी उरणच्या मासळी बाजारात गर्दी झाली होती.

उरण तालुक्यातील किनारपट्टीवरील करंजा, मोरा, दिघोडे, आवरे परिसरात मोठ्या प्रमाणात खोल समुद्रातील मासेमारी करण्यात येत आहे. यामध्ये, सुमारे ७००पेक्षा अधिक मासेमारी बोटी असून मासळीची खरेदी-विक्री करण्यासाठी त्यांना मुंबईतील ससून डॉक आणि भाऊचा धक्का येथे जावे लागत होते. दरम्यान, राज्य आणि केंद्र सरकारच्या माध्यमातून ६०० मीटर लांबीचे 'फिशिंग डॉक' करंजा येथे उभारण्यात आले आहे. यामध्ये, मासेमारी बोटीतील मासळी बंदरात उतरवून त्याच्या खरेदी-विक्रीला सुरुवात करण्यात आली आहे. यामुळे नव्याने सुरू झालेल्या 'करंजा द्रोणागिरी मत्स्य व्यवसाय बंदर' येथे अनेक व्यापारी आणि स्थानिक रहिवासी हे घाऊक आणि दैनंदिन गरजेसाठी आवश्यक मासळी खरेदी करण्यासाठी गर्दी करू लागले आहेत.

**कोळंबी, खेकड्यांना अधिक मागणी**

**खोल समुद्रातील मासळीबरोबरच खाडी आणि तळ्यात पाळण्यात येणाऱ्या ताज्या मासळीचीही अधिकची मागणी वाढली आहे. यात मासे, कोळंबी, खेकडे आदी ताजी मासळी बाजारात येऊ लागली आहे.**

यामध्ये सायंकाळच्या सुमारास भरणाऱ्या बाजारामध्ये छोट्या करंदीपासून कोळंबी, पापलेट, सुरमई, रावस, कलेट, हलवा, कुपा, बोंबील अशा सुमारे ३० ते ४० प्रकारचे अनेक मासे विक्रीसाठी दिसून येत आहेत, तर करंजा येथील या बंदरात १०० रुपयांपासून १२०० रुपये किलोच्या दराने मासळी विक्री करण्यात येत असल्याचे सांगण्यात आले. करंजा बाजारात बला, वाम, पाला, माखली, मांदेली, ढोमी, पाकट, शिंगाला, चिंबोरी असे मासेदेखील विक्रीसाठी असल्याचे दिसून आले आहे, तर या मासळी बाजारात सुरमई, कोळंबी, कुपा, पापलेट यांना अधिक मागणी आहे.

## तक्का येथे 'हर घर नल, हर घर जल' अंतर्गत कामाचा शुभारंभ



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तक्का येथे हर घर नल हर घर जल या संकल्पनेतून पाईपलाईन टाकण्यात येणार आहे. या कामाचा शुभारंभ माजी नगरसेवक अजय बहिरा यांच्या हस्ते शनिवारी (दि.२१) झाले. पाण्याचा प्रश्न मार्गी लावल्याबद्दल परिसरातील महिलांनी भाजपचे आभार मानले आहेत.

पनवेल महापालिका क्षेत्रातील तक्का परिसरात नव्याने पाणी पुरवठा करण्याच्या दृष्टीकोनातून आमदार प्रशांत ठाकूर आणि माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली माजी नगरसेवक अजय बहिरा हे पाठपुरावा करीत होते. त्यांच्या पाठपुराव्याला यश आले असून पनवेल महापालिकेच्या वतीने तक्का येथील दर्यापासून ते नवीन पाण्याच्या टाकीपर्यंत पाण्याची पाईपलाईन टाकण्यात येणार आहे. या कामाचा शुभारंभ माजी नगरसेवक अजय बहिरा यांच्या हस्ते शनिवारी झाला. हे काम सुमारे १३ लाख रुपयांच्या निधीमधून करण्यात येणार आहे.

या वेळी भाजपच्या उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस चारुशीला घरत, भाजप महिला मोर्चाच्या शहराध्यक्ष राजश्री वावेकर, माजी नगरसेवक प्रभाकर बहिरा, प्रभाग अध्यक्ष रघुनाथ बहिरा, भाजप शहर चिटणीस महेश राऊळ, चंदा बहिरा, भारती बहिरा, भगवान बहिरा, जितू खुटकर, सचिन चिखलेकर, भारत बहिरा, मोसमी बहिरा, भारती बहिरा, संजना बहिरा यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**पनवेल : शासनाच्या वतीने तळोजा येथे वकील अकॅडमीसाठी प्लॉट उपलब्ध झाला आहे. या प्लॉटच्या भूमीसंदर्भात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची महाराष्ट्र-गोवा बार असोसिएशनचे माजी चेअरमन अ‍ॅड. पारिजात पांडे आणि पनवेल बार असोसिएशनचे अध्यक्ष अ‍ॅड. मनोज भुजबळ यांची शनिवारी त्यांच्या निवासस्थानी सदिच्छ भेट घेऊन चर्चा केली. या वेळी अ‍ॅड. विनायक कोळी, अ‍ॅड. भूषण म्हात्रे, अ‍ॅड. नितीन केळकर उपस्थित होते.**





**पनवेल : आमदार प्रशांत ठाकूर तसेच भाजप पनवेल विधानसभा प्रमुख तथा जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ओबीसी मोर्चा सोशल मीडिया सेल जिल्हा प्रभारी तथा शहर संयोजक प्रसाद हनुमंते यांच्या वाढदिवसानिमित्त नेरे, भानघर येथील करुणेश्वर ओल्डएज केअर हाऊसमधील वृद्धांना नाश्त्याचे वाटप करण्यात आले. या वेळी कौस्तुभ हनुमंते, नरेंद्र सोनावणे तसेच करुणेश्वर हाऊसचे विश्वस्त ईश्वर धोत्रे उपस्थित होते.**

## सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये आजी-आजोबा दिवस उत्साहात





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उलवे येथील रयत शिक्षण संस्थेच्या सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये शुक्रवारी (दि.२०) आजी-आजोबा दिवस मोठ्या उत्साही व आनंददायक वातावरणात साजरा झाला.

पूर्व प्राथमिक विभागातर्फे आयोजित या कार्यक्रमांमध्ये सुमारे ५० आजी-आजोबांनी सहभाग घेतला होता ज्यामध्ये त्यांच्यासाठी त्यांच्या बालपणीचे काही खेळ आयोजित करण्यात आले होते. त्यासोबतच सर्व आजी-आजोबांनी आपल्या नातवंडांसोबत सोबत विविध अ‍ॅक्टिव्हिटीमध्ये सहभाग घेतला. गाणे, भाषण, खेळ आदी विविध गोष्टीमुळे आजी-आजोबांना आपल्या बालपणाची आठवण झाली. सर्व नातवांनी आजी आजोबांच्या चरणावर फुले वाहून त्यांचे आशीर्वाद घेतले.

असे विविध उपक्रम स्कूलच्या वतीने नेहमी आयोजित व्हावेत असे सदिच्छा व्यक्त करीत प्रत्येकाने या कार्यक्रमाबद्दल स्कूलचे आभार मानले. स्कूलच्या मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर यांनीदेखील कार्यक्रमास उपस्थित राहिल्याबद्दल सर्व आजी-आजोबांचे आभार मानले.



### शिरढोण येथे गौरा गणपतीनिमित्त विविध कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अचानक मित्र मंडळ यांच्या वतीने त्यांच्यातर्फे गौरा गणपतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

श्रीराम भजनी मंडळ स्पर्धा, महिलांसाठी पैठणीचा खेळ, सिंगर विजय सोबत महिलांसाठी फेऱ्यांचे गाणे, मोफत आरोग्य शिबिर अशा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. आरोग्य तपासणी रविवारी (दि.२२) क्रांती मंदिर मैदान, शिरढोण येथे होणार आहे. या सर्व कार्यक्रमांचा व आरोग्य शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

## रामशेठ ठाकूर विद्यालयाचे ज्युडो स्पर्धेत घवघवीत यश



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने मुंबई विभागस्तरीय शालेय ज्युडो स्पर्धेमध्ये घवघवीत यश मिळवले आहे.

राज्य क्रीडा व युवक सेवा संचलनालय, उपसंचालक क्रीडा व युवक सेवा, मुंबई विभाग, जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय ठाणे अंतर्गत मुंबई विभागस्तरीय शालेय ज्युडो स्पर्धा नुकतीच गोरेगाव-मुंबई येथे झाली. यात रामशेठ ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने एक सुवर्ण, पाच रौप्य आणि ११ कांस्यपदक पटकविले आहेत. ओसमा उमरमिया पटेल यांस सुवर्णपदक मिळाले असून त्याची निवड राज्यस्तरीय ज्युडो स्पर्धेसाठी झाली आहे.

आयुष संजय राऊत, वेद संजय चव्हाण, शिवम सुरेंद्र चैनपुरीया, सुमित मल्लेश शिवगाडगे, खानसा इरफान दुक्का यांना रौप्यपदक मिळाले असून आर्यन लक्ष्मण भातोसे, अजित राजेंद्र झिने, सायली विशाल घरत, जिया गुरुनाथ वासकर, दिक्षा बंडू इंगोले, पार्थ हनमंत सपकाळ, प्रित विलास भोईर, साबेरा खालीकुल उस्मानी, निर्जला ब्रम्हा शाही, इशिता प्रशांत शिंदे, दिशा उमेश घनवट यांना कांस्यपदक मिळाले आहेत. या सर्व स्पर्धकांना क्रीडाशिक्षक प्रवीण पाटील व संभाजी जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरूणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, बोर्ड ऑफ डायरेक्टर संजय भगत, सचिव एस.टी. गडदे, स्कूल कमिटी मेंबर प्रभाकर जोशी, प्राचार्य निशा नायर, मुख्याध्यापक संतोष खांडेकर यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.




### लाडकी बहीण योजनेसाठी वॉल सिग्नेचर मोहीम

**खारघर : प्रतिनिधी**

महिलांच्या कल्याणासाठी राबवली जाणारी लाडकी बहीण योजनेत खंड नको म्हणून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीच्या पनवेल जिल्हा महिला राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने नुकतीच वॉल सिग्नेचर मोहीम राबविण्यात आली.

जिल्हाध्यक्ष प्रज्ञा चव्हाण यांच्या माध्यमातून हा उपक्रम राबविण्यात आला. या वेळी माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांनी ही योजना भविष्यातही अशीच पुढे चालू राहावी याकरिता वॉल सिग्नेचर मोहिमेमध्ये सहभागी घेऊन या योजनेला पाठिंबा म्हणून आपली स्वाक्षरी केली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने अजिंक्य घड्याळ महिला संवादाचे आयोजनदेखील शुक्रवारी कामोठ्यात करण्यात आले होते.



## कामोठ्यात ईद-ए-मिलाद मिरवणूक उत्साहात

**पनवेल : वार्ताहर**

ईद-ए-मिलादनिमित्त कामोठे येथील सुन्नी गौसिया चिश्तीया ट्रस्टने बुधवारी (दि.१८) मिरवणूक (जुलूस) काढली होती. कामोठे येथे पाच ते सहा हजार बांधव या जुलूसमध्ये सहभागी झाले होते. भाजपचे अल्पसंख्यांक मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष सय्यद अकबर यांची या जुलूसमध्ये प्रमुख उपस्थिती होती.

सुन्नी गौसिया चिश्तीया ट्रस्टचे प्रमुख संस्थापक इम्रान शेख, सेक्रेटरी सादिक उमर शेख, अध्यक्ष लाबुद्दीन शेख यांच्या मार्गदर्शनाखाली ट्रस्टच्या वतीने ईद-ए-मिलादनिमित्त कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

कामोठे येथे सोमवारी सुन्नी गौसिया चिश्तीया ट्रस्टने हजरत मोहम्मद पैगंबर यांची मानवतेची, सर्व समायोजकतेची शिकवण देण्याच्या उद्देशाने एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात आले रसूल सजदा नशीन किच्छोचा, शरीफ हजरत मोईन मिया, रझा अकॅडमीचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष सैय्यद नुरी, मौलाना मुफ्ती अजमल असरी अझारी, शेर-ए-राजस्थान मुफ्ती समीउल्ला कादरी, मौलाना अब्दुल रहमान झियाई आदी उपस्थित होते.

जुलूसमध्ये सहभागी झालेले सय्यद अकबर म्हणाले की, गणेशोत्सवानंतर जुलूस काढण्याचा निर्णय हा सामाजिक सौदार्ह, जातीय सलोखा न दोन समाजात भाईचारा निर्माण करणारा आहे. सुन्नी गौसिया चिश्तीया ट्रस्ट ही मुस्लिम बांधवांसाठी झटणारी एकमेव धार्मिक संस्था आहे. प्रमुख संस्थापक इम्रान शेख, सेक्रेटरी सादिक उमर शेख, अध्यक्ष लाबुद्दीन शेख, यांच्या माध्यमातून अनेक गरजवंतांना भरघोस सहकार्य केले जाते.

या वेळी सेक्रेटरी सादिक उमर शेख, शेहजाद मसुरी, मुमताज भाई, नायाब शेख, रईस भाई, राशिद भाई, असरार भाई, अब्बास चाचा आदी सहभागी झाले होते.

# लाडकी बहीण योजनेमुळे महायुतीला अनुकूल वातावरण

## विधानसभा निवडणुकीत मोठे यश मिळणार -खासदार सुनील तटकरे

**माणगाव : प्रतिनिधी**

राज्यात लाडकी बहीण योजनेमुळे महायुतीला अनुकूल वातावरण निर्माण झाले असून महिलांमध्ये या योजनेमुळे प्रचंड दिसत असलेला उत्साह पाहून आगामी विधानसभा निवडणुकीत राज्यात महायुतीला मोठे यश मिळेल, असा विश्वास खासदार सुनील तटकरे यांनी व्यक्त केला. ते तळाशेत येथील कार्यक्रमात बोलत होते.

माणगाव तालुक्यातील राष्ट्रवादीचे नवनियुक्त पदाधिकारी तालुकाध्यक्ष काका नवगणे, दक्षिण रायगड जिल्हा कार्याध्यक्ष सुभाष केकाणे, कोकण प्रदेश प्रवक्ता ॲड. सायली दळवी,रायगड जिल्हा नियोजन समिती सदस्य बाबूशेठ खानविलकर, जिल्हा समन्वयक राजू मोरे, जिल्हा युवक कार्याध्यक्ष शादाब गैबी यांचा सत्कार समारंभ खासदार तटकरे यांच्या हस्ते व पक्षाचे जेष्ठ नेते शेखर देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी (दि. २०) तळाशेत (इंदापूर) येथील शकुंतला मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमास ज्येष्ठ नेते महादेवराव बक्कम, प्रदेश युवक सचिव दीपक जाधव, जिल्हा चिटणीस उदय अधिकारी, महिला तालुकाध्यक्ष संगीता बक्कम, मोर्बा सरपंच शौकत रोहेकर, ज्येष्ठ नेते भिकूशेठ धाडवे, रामभाऊ टेंबे, हुसेन राहटविलकर, रघुनाथ उभारे, माजी पं.स. सदस्य शैलेश भोनकर, तालुका राष्ट्रवादी महिला उपाध्यक्ष श्रद्धा यादव, भागोजी डवले, उणेगाव माजी सरपंच राजेंद्र शिर्के, इंदापूर विभाग महिला अध्यक्ष संगीता चव्हाण, प्रतिभा जाधव, माजी सरपंच संतोष ढाकवळ, वारक सरपंच वैष्णव साठे, संतोष यादव, नितीन घोणे, मेघनाथ सातपुते, संजय दळवी, राजेंद्र जाधव, सर्व सत्कारमूर्ती, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येनी उपस्थित होते.

या वेळी खासदार सुनील तटकरे पुढे म्हणाले की, आपल्या सर्वांच्या आशीर्वादाने व पाठिंब्याने मला वेगवेगळ्या पदांवर काम करण्याची संधी मिळाली. लोकसभा निवडणुकीत या सर्व परिसराने मला भरभरून मतदान केले. सर्वांच्या





सहकार्यामुळेच तुमचा प्रतिनिधी म्हणून मी दिल्लीच्या संसदेत काम करतोय. आजपर्यंतच्या सर्व निवडणुका आपण विकासाच्या मुद्द्यावर लढलो त्याप्रमाणे लोकसभेची निवडणूकही विकासाच्या मुद्द्यावर लढून २०१९च्या निवडणुकीपेक्षा तब्बल अडीच पटीने जास्त मताधिक्य मला या २०२४च्या निवडणुकीत तुमच्या सर्वांच्या आशीर्वादाने मिळाले. राज्य सरकारच्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेमुळे राज्यात महायुतीला अनुकूल वातावरण असून येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत महायुतीला मोठे यश मिळेल असे सांगत नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना त्यांनी शुभेच्छा दिल्या.

इंदापूर विभागातील विकासकामे येणाऱ्या काळात शीघ्र गतीने केली जातील, असेही त्यांनी सांगितले. या वेळी त्यांनी इंदापूर विभाग राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षपदी माणगाव पं.स. चे माजी सदस्य शैलेश भोनकर व इंदापूर जि.प. गणाच्या अध्यक्षपदी महेश महाजन यांची नियुक्ती जाहीर करून त्यांना तशा आशयाचे नियुक्तीपत्र दिले.

अध्यक्षीय भाषणात ज्येष्ठ नेते शेखर देशमुख म्हणाले की, सन १९७०पासून इंदापूर विभागातच नव्हे तर तालुक्यात मी राजकारण करतोय. त्यामुळे कोणती पदे महत्त्वाची हे मला माहीत आहेत. इंदापूर विभागाला स्व. पंढरीअण्णा पालकर यांच्यानंतर ३५ वर्षांनी काका नवगणे यांच्या रूपाने माणगाव तालुकाध्यक्षपद मिळाले आहे. नवगणे यांनी पक्षाचे विभागीय अध्यक्ष म्हणून चांगले काम केले असून ते तालुकाध्यक्ष म्हणून सर्वांना सोबत घेऊन चांगले काम करतील. सुभाष केकाणे यांनी तालुकाध्यक्ष म्हणून पक्षाचे चांगले काम केल्याने पक्षनेतृत्वाने त्यांना बढती दिली. बाबूशेठ खानविलकर,ॲड.सायली दळवी,राजू मोरे, शादाब गैबी या सर्वांनी पक्षाचे चांगले काम केल्याने त्यांनाही बढती देण्यात आली. आता या सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांची जबाबदारी वाढली असल्याची त्यांनी सांगून सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या.

ज्येष्ठ नेते महादेवराव बक्कम म्हणाले की, तालुक्यात खासदार सुनील तटकरे व कुटुंबियांच्या माध्यमातून विकासकामे झाली असल्याने येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत अदिती तटकरे यांना भरभरून मताधिक्य देऊ. सुभाष केकाणे व काका नवगणे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक पक्षाचे जिल्हा चिटणीस उदय अधिकारी, तर सूत्रसंचालन मेघनाथ सातपुते यांनी केले.

## महिला सुरक्षितता आणि शिष्यवृत्तीवर कार्यशाळा



**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड येथील अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स येथे महिला विकास कक्ष व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने महिला सुरक्षितता व शिष्यवृत्ती या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे शुक्रवारी (दि. २०) आयोजन करण्यात आले होते.

महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यशाळा झाली. त्यांनी आपल्या भाषणातून विद्यापीठ अनुदान आयोग व शासनामार्फत महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपाययोजनांबद्दल माहिती दिली.

या कार्यशाळेस विधीतज्ज्ञ तथा रायगड जिल्हा सत्र न्यायालयाचे ॲड. विक्रांत पाटील यांना पाचारण करण्यात आले होते. त्यांनी महिला सुरक्षा कायद्यांची माहिती विद्यार्थिनींना करून दिली. नोडल अधिकारी नवाब शेख यांनी विद्यार्थिनींना शासनाच्या विविध शिष्यवृत्तीची माहिती करून दिली.

सूत्रसंचालन प्रा. निदा गोरमे यांनी केले. कार्यशाळेसाठी महिला विकास कक्ष प्रमुख डॉ. स्वाती खराडे, ग्रंथपाल अंजुम दाखवे व अमरीन छापेकर, फातिमा सुर्वे, हुमेरा घारे, अरफा कलबसकर, मदिहा कागदी, रिया ठाकूर यांनी परिश्रम घेतले.

## खालापूर टोलनाका येथे वाहनचालकांचे समुपदेशन

**खोपोली : प्रतिनिधी**

मानवी चुकांमुळे होणारे अपघात टाळता यावे यासाठी खोपोली पोलीस ठाण्याचे निरीक्षक शितल राऊत यांनी मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर खालापूर टोलनाका येथे चालकांचे समुपदेशन केले. या वेळी त्यांनी वाहतूक नियम व सुरक्षेबाबत माहिती दिली.

भारतातील पहिला सहापदरी मार्ग म्हणून मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग तयार झाला. दोन महानगरांमधील अंतर कमी करणारा, प्रवास आणि इंधनाची बचत यासाठी हा द्रुतगती मार्ग तयार करण्यात आला, परंतु वारंवार जीवघण्या अपघातामुळे द्रुतगती मार्ग धोकादायक बनला आहे. द्रुतगती मार्गावर वेग आणि लेनच्या नियमाबाबत वाहनचालकांकडून दुर्लक्ष केले जात



असल्यामुळे अपघात घडत असून त्याबाबत वाहनचालकांमध्ये जागरूकता वाढावी यासाठी खालापूर टोलनाका येथे खोपोली पोलीस ठाण्याचे निरीक्षक शितल राऊत यांनी वाहनचालकांना मार्गदर्शन करत सूचना दिल्या. यामध्ये प्रामुख्याने स्पीड लिमिट किती असावे, सीट बेल्ट लावणे किती महत्त्वाचे आहे आदी सूचना देण्यात आल्या.

## माथेरान पालिकेकडून शौचालयांची स्वच्छता

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान नगर परिषदेकडून येथील पॉईंट परिसरातील असलेल्या शौचालयांची स्वच्छता करण्यात आली असून पाण्याची व्यवस्थासुद्धा केली गेली आहे.

माथेरान पर्यटनस्थळी आता पावसाळी हंगाम जवळजवळ संपत आला आहे. या ठिकाणी लवकरच आता दिवाळी हंगामाला सुरुवात होणार आहे. माथेरानमध्ये दिवाळी हंगामात मोठ्या प्रमाणावर पर्यटक येथे येत



असतात. पर्यटकांकडून माथेरान पालिका प्रवासी कर आकारणी करीत असते. त्यामुळे येणाऱ्या पर्यटकांना सोयीसुविधा उपलब्ध करून देणे ही पालिकेची जबाबदारी असल्याने आणि पॉईंट परिसरातील दुकानदारांनी पाठपुरावा केल्याने येथील मुख्य पॉईंटवरील शौचालयांना पाणी जोडणी करून संपूर्ण शौचालयांची स्वच्छता करून शौचालये पर्यटकांच्या वापरासाठी खुली करण्यात आली आहेत. पालिकेने शौचालयांची स्वच्छता केल्यामुळे निसर्ग पर्यटन पॉईंट स्टॉल वेल्फेअर असोसिएशनकडून आभार मानण्यात आले.

**माथेरान निसर्ग पर्यटन पॉईंट स्टॉल वेल्फेअर असोसिएशनच्या वतीने पालिकेला पॉईंट परिसरातील शौचालये स्वच्छतेबाबत निवेदन देण्यात आले होते. मुख्य दिवाळी हंगामापूर्वी पॉईंट परिसरातील शौचालये स्वच्छ करून पाणी जोडणी करून दिल्याबद्दल पालिकेचे धन्यवाद. आता येणाऱ्या पर्यटकांची गैरसोय या ठिकाणी होणार नाही.**

**-संतोष कदम**, भाजप कार्यकर्ते तथा अध्यक्ष
माथेरान निसर्ग पर्यटन पॉईंट स्टॉल वेल्फेअर असोसिएशन

## अरुण साळुंखे यांच्या पुस्तकाचे प्रकाशन



**चौक : प्रतिनिधी**

गायक, गीतकार, संगीतकार, लेखक, कवी आणि कोयना प्रकल्पग्रस्त जनतेच्या अडचणींची प्रभावी अंमलबजावणी करण्यास प्रयत्न करणारे लेखक अरुण शांताराम साळुंखे यांच्या 'मागे वळून पाहताना' या पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच राज्य लेखा व कोषागारे विभागाचे संचालक रवींद्र धोंडगे यांच्या हस्ते व समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त विभिषण चवरे यांच्या उपस्थितीत झाले.


लेखक अरुण साळुंखे हे राज्य सरकारच्या सेवेत असून विविध सांस्कृतिक कार्यक्रमात त्यांचा सहभाग असतो. मुंबई शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या भातसा धरणाच्या परिसरातील आठवणी, घटना अशा ४० लेखांची मालिका साळुंखे यांच्या 'मागे वळून पाहताना' या पुस्तकात आहे. सद्यपरिस्थितीत माणसाला काही दिवसांचे पूर्वीचे आठवत नाही, पण आपल्या मागील ५० वर्षांच्या आठवणी जशाच्या तशा व्यक्त करणारा लेखक निराळाच, असे लेखक कवी प्रा. डॉ. अंकुश सारंग यांनी मनोगतात सांगितले.

कार्यक्रमास साहित्य क्षेत्रातील मान्यवर, लेखक, कवी, गीतकार, संगीतकार, सांस्कृतिक व लेखा व कोषागारे विभागातील पदाधिकारी यांच्यासह कोयना प्रकल्पग्रस्त जनतेचे नेते सुरेश मोरे, सुरेश कदम, जगन्नाथ साळुंखे, दिलीप कदम, विजय मोरे, प्रकाश साळुंखे, मित्र परिवार, नातेवाईक उपस्थित होते.

## विजयभूमी विद्यापीठात वृक्षारोपण

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील जांबरुंग गावात असलेल्या विजयभूमी विद्यापीठात कन्याथॉन उपक्रमांतर्गत एक झाड गुरूच्या नावे या वृक्षारोपण मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. या मोहिमेची प्रेरणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या एक झाड आईच्या नावे या जागतिक पर्यावरण दिनानिमित्त सुरू केलेल्या उपक्रमातून घेण्यात आली आहे.



या कार्यक्रमास मुख्याध्यापक रमेश पिंगळे, जिल्हा परिषद केंद्र शाळेचे मुख्याध्यापक चंद्रकांत भगत, विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात जनसंपर्क अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते विकास चित्ते यांनी मोहिमेची कल्पना आणि महत्त्व सांगून केली. विद्यापीठाच्या संचालिका कल्पना पडोडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुश्री करंभे, ऋषिकेश घाडगे यांनी विद्यार्थ्यांना वृक्षांची माहिती दिली. विद्यापीठाने या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना स्टीलच्या पाण्याच्या बाटल्या वितरित करत प्लास्टिकचा वापर कमी करण्याचे महत्त्व पटवून दिले.

## थोर मानवतावादी कर्मवीर भाऊराव पाटील

थोर मानवतावादी, शिक्षणमहर्षी कर्मवीर भाऊराव पाटील यांची आज जयंती. त्यांनी श्रमाच्या प्रतिष्ठेला विशेष महत्त्व दिले. श्रम करणे हे प्रतिष्ठेचे लक्षण मानले गेले पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. ते म्हणत, श्रम करूनच विद्यार्थ्यांनी शिक्षण घ्यावयास पाहिजे. गरीब व होतकरू मुले काम दिल्यास ती आनंदाने करतात व अभ्यासामध्ये त्याचा काही परिणाम न होता परीक्षेचा निकाल चांगला लागतो. प्रत्येकाने आपला व्यवसाय केला पाहिजे व त्याची त्यास लाज वाटता उपयोगी नाही.

घरातील दारिद्र्य, दैन्य नाहीसे करणारा देव म्हणजे श्रम. म्हणूनच 'श्रमो हि परमो धर्मः' असे म्हटले गेले आहे.

*श्रम एव मनुष्याणां*
*कारणं हित सौख्ययोः।*
*विभवोत्कर्षयोर्योग*
*क्षेमयो स्वर्ग मोक्षयोः।।*

कुठल्याही कार्याची सिद्धी-सफलता परिश्रमाशिवाय प्राप्त होत नाही. कर्मवीर भाऊराव पाटील म्हणतात, 'श्रम करा, मेहनत घ्या' ऋग्वेदात म्हटले आहे...

*न ऋते श्रान्तस्य सख्याय देवाः।*

श्रम करून थकलेल्या श्रमिकांनाच ईश्वर मदत करतो.

कर्मवीर भाऊराव पाटील म्हणतात, 'आम्ही आमच्या संस्थेत श्रमास महत्त्व दिले. हाताने कार्य करीत असताना कमीपणा वाटायला नको. आपले भांडवल जर काही असेल तर ते मनगट हे आहे.

'स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद' हे रयत शिक्षण संस्थेचे घोषवाक्य आहे. त्याकरिता कर्मवीर भाऊराव पाटील यांनी कमवा व शिका ही योजना राबविली. सातारा येथे जून १९४७पासून छत्रपती शिवाजी महाविद्यालय सुरू केले. तत्त्व म्हणून आणि आर्थिक अडचणींवर उपाय म्हणून अण्णांनी स्वालंबनाचा उपाय अवलंबिला. स्वावलंबनाने शिक्षण घेण्याची संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध व्हावी म्हणून अण्णा नेहमी पडीक जमिनीची मागणी करत असत. ते म्हणतात, पडीक जमीन घेऊन ती सुपीक करणे व त्यातून विद्यार्थ्यांच्या



गरजा भागविणे हा माझा हेतू आहे. केवळ शिक्षण घेऊन भागणार नाही, तर आपण स्वावलंबी बनले पाहिजे.

या योजनेनुसार एक तास शारीरिक कष्टाचे काम करणाऱ्या विद्यार्थ्याला मजुरीच्या रुपाने तीन आणे मिळत असत. रोज दोन तासांपेक्षा जास्त वेळ काम करू दिले जात नसे, मात्र रविवारी व सुट्टी दिवशी या विद्यार्थ्यांना जास्त वेळ काम करण्याची मुभा होती. कालांतराने विद्यापीठानेसुद्धा ही योजना स्वीकारली.

श्री छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊस या वसतिगृहात तसेच कमवा व शिका या योजनेमधून उच्चविद्याविभूषित झालेले काही विद्यार्थी राजकारण, समाजकारण या क्षेत्रात यशोशिखरावर पोहचले. या योजनेमधून, या वसतिगृहातून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासारखा एक मोठा आधारस्तंभ या महाराष्ट्राला लाभला. स्वतःची शिक्षण संस्था असतानाही लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मातृसंस्था रयत शिक्षण संस्थेवर मनापासून आणि निस्वार्थीपणे प्रेम केले, रयतेला भरभरून दिले.

कमाल स्वार्थत्यागाचा आणि बहुजन सेवेचा वारसा कर्मवीर भाऊराव पाटील यांना पूर्वजांकडून मिळाला होता. महात्मा गौतम बुद्धाप्रमाणे करुणा हा अण्णांचा स्थायीभाव होता. अण्णा म्हणत, संत तुकाराम महाराज हे महाराष्ट्रातील संत मालिकेतील मुकुटमणी होत. तुकाराम महाराजांचे जीवन साधे व सरळ होते, पण या साध्या व सरळ वाटणाऱ्या त्यागमय जीवनात मोठेपणाची अनेक लक्षणे वास करीत होती. मोठी माणसे ध्येयवादी असतात. ध्येयाचा ध्रुवतारा सतत त्यांच्या दृष्टीसमोर तेवत असतो. ध्येयप्राप्तीसाठी ते सर्वस्वाचा त्याग करतात. संत नामदेवांनी सर्व हिंदुस्थानभर वारकरी संप्रदायाचा प्रसार केला. संत ज्ञानेश्वर व संत एकनाथ यांनी विपुल लेखन केले. संत नामदेव व संत तुकाराम यांचीच परंपरा पुढे संत गाडगे महाराज, संत कैकाडी महाराज यांनी चालविली. प्राचीन काळी संतांनी जे लोकसेवेचे कार्य केले तेच कार्य आजच्या काळाला अनुसरून अण्णांनी शिक्षणाद्वारे उभे केले.

कर्मवीर भाऊराव पाटील म्हणतात, माझे असे ठाम मत आहे की, कोणत्याही गावात देवळापेक्षा शाळेला खास अधिक महत्त्व मिळाले पाहिजे, कारण देवळात केवळ एक दगडाची मूर्ती असते, पण शाळा मंदिरात अनेक जिवंत विठ्ठलाच्या मूर्ती असतात. देशाचे खरे कार्य म्हणजे शाळेतील विठ्ठलांचे शिक्षण होय.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज म्हणायचे, माणसं घडवायची तर शाळा पाहिजेत. संत रामदास व संत तुकाराम यांच्याप्रमाणे हा ध्येयवाद अण्णांच्याही मनात आणि जीवनात रुजलेला होता. अण्णांची हीच धारणा होती, वृत्ती होती...

*शरीर परोपकारी लावावें।*
*बहुतांच्या कार्यास यावें।।*
*उणे पडो ने दावें। कोणी येकाचे।।*
*जितुकें कांहीं आपणासि ठावें।*
*तितुकें हळूंहळूं सिकवावें।*
*शहाणे करुन सोडावें। बहुत जन।।*
*जे कां रंजलें गांजले।*
*त्यांसि म्हणजे जो आपुले ।।१।।*
*तोचि साधु ओळखावा।*
*देव तेथेचि जाणावा।। २।।*

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या बोलण्यात, वागण्यात अतिशय नम्रता होती. नम्रता हा अण्णांचा स्वभाव आहे. प्रत्येकाशी बोलताना आण्णा नेहमी आपण, आपल्या या शब्दांचा वापर करत. अण्णा, वसतिगृहातील सर्व मुलांबरोबरही प्रेमाने, आपुलकीने बोलत असत. ते आपल्या आईस देव मानत. कोणत्याही गोष्टीचा, कार्याचा शुभारंभ करण्यापूर्वी ते आईस नमस्कार करीत व आशीर्वाद घेत. शास्त्रामध्ये लिहिले आहे की, जी व्यक्ती रोज वडीलधाऱ्यांच्या सन्मानार्थ नमस्कार करुन पाया पडते, त्याचे वय, विद्या, यश आणि शक्ती काळासोबत वाढत जाते.

*अभिवादनशीलस्य नित्यं वृध्दोपसेविनः।*
*चत्यारि तस्य वर्धन्ते आयुर्विद्या यशो बलम्।।*

कर्मवीर भाऊराव पाटील म्हणतात, माझ्या संस्थेतील प्राथमिक शिक्षकांनी फार मोठा त्याग केला आहे. आमच्या शिक्षकांनी दरमहा सहा रुपये घेऊन अत्यंत साधेपणाने राहून व गावकऱ्यांकडे जेवून कामे केली आहेत. प्राथमिक शिक्षकच खेड्यांना खरे मार्गदर्शक होऊ शकतील. अण्णा म्हणत, शिक्षक हा चारित्र्यसंपन्न असला पाहिजे. त्याने सतीचे वाण घेऊन शिक्षणदानाचे कार्य केले पाहिजे.

श्री छत्रपती शाहू बोर्डिंगचा खर्च भागविण्यासाठी रोख व धान्य रुपाने अण्णा मदत गोळा करीत. अण्णांनी आपले सर्वस्व या कार्याकरिता खर्च केले व आपली धर्मपत्नी सौ. लक्ष्मीबाई यांनी याच कार्याकरिता आपला शेवटचा दागिना म्हणजे मंगळसूत्रही उपयोगात आणले. वैयक्तिक संसाराची अण्णांनी कधीच चिंता केली नाही. कुटुंबासाठी त्यांनी काही केले नाही, काही ठेवले नाही.

*देवाची ते खूण। आल्या ज्याच्या घरा।*
*त्याच्या पडे चिरा। संसाराला।।*

महान लोक स्वतःचे नुकसान होत असले तरीही समाजाचे, राष्ट्राचे हित साधतात. बेकल उत्साहींचा एक शेर महान लोकांमधील त्यागाचे, त्यांच्या गुणांचे वर्णन करतो...


*ऐ हवाओं के झकोरों*
*कहां आग लेके निकले,*
*मेरा गांव बच सके तो*
*मेरी झोपडी जला दो।*

हा विचार, ही भावना माणसाला महान बनवते.

महात्मा ज्योतिराव फुले, महर्षी अण्णासाहेब शिंदे, छत्रपती शाहू महाराज व महात्मा गांधीजींच्या कार्याचे वारसदार कर्मवीर भाऊराव पाटील यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

**- प्रा.डॉ. विजयकुमार रणदिवे, पनवेल**

### अण्णा तुमच्या ऋणात...



*अण्णा तुमच्या ऋणात*
*राहील इथली माती*
*दीन दुबळ्या रयतेची*
*बिजांकुरली नव नाती,*
*बहुजन यज्ञात अविरत*
*तेवते ही कर्मज्योती*
*ज्ञानमंदिरी स्फूर्ती*
*दायक ही तुमची ख्याती,*
*कणाकणात ओसंडते*
*त्यागाची अनुभूती*
*वायूसवे खग 'कर्ण'*
*साथी रयत गीत गाती,*
*अज्ञानतिमीरी खितपत*
*इथल्या जातीपाती*
*ज्ञान कवाडे होता*
*खुली रयत झाली ज्ञाती,*
*दारिद्र्याची करूण*
*कहाणी घरोघरी होती*
*बहुजनोद्धारार्थ धरी*
*शस्त्र शिक्षणाचे हाती,*
*अन्याय्य झुगारून*
*रणझुंजार तुम्ही झुंजला*
*विरोधास ना धजावे*
*कुणाची मुजोर छाती,*
*आता कैक सैरभैर*
*झाले ना कुणाची भिती*
*राजरोस पोखरून*
*कणगी किडे तत्व खाती,*
*विझविण्या रयतदिप*
*आतुर काही तिमीरप्रेमी*
*ज्वलंत कर्म निष्ठेने*
*होवो प्रज्वलित वाती,*
*'सागर' मंथनात*
*शोधती 'रयत'ज्ञान मोती*
*खरा वारस एक अण्णा*
*जया 'राम' बाण हाती.*

**-सागरकुमार रंधवे, उपशिक्षक, श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ. भगत ज्युनिअर कॉलेज, गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड**




पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी उलवे सेक्टर ८चा राजा मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या गौरा गणेशोत्सवाला भेट देऊन गणरायाचे दर्शन घेतले. या वेळी गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत, किशोर पाटील, अनंता ठाकूर, सुधीर ठाकूर, विश्वनाथ कोळी, सुहास भगत, योगिता भगत, सुदर्शन घरत, वैभव घरत, भाऊ भोईर, गजानन घरत, पी.के. ठाकूर, जयश्री घरत, सुजाता पाटील, शिवानी रॉय, संध्या त्रिपाठी, नर्मदा घरत, नंदा भोईर, निशा घरत, सागर ठाकूर, मंडळाचे अध्यक्ष दिलीप चव्हाण, राजू घरत, मनोज यादव, राजू पाटील, राजू घरत आदी उपस्थित होते.





पनवेल : आमदार प्रशांत ठाकूर यांनी विविध ठिकाणच्या गौरा गणपतींचे दर्शन घेतले. या वेळी त्यांचे स्वागत करण्यात आले. सोबत पदाधिकारी, कार्यकर्ते आणि भाविक.















पनवेल : भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी ठिकठिकाणी विराजमान झालेल्या गौरा गणपतींचे दर्शन घेतले. या वेळी तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस भूपेंद्र पाटील, अनुसूचित जाती मोर्चा जिल्हाध्यक्ष अमित जाधव, भाजप पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, सुकापूर गाव अध्यक्ष राजेश पाटील, शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच आनंद ढवळे, आदई गाव अध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील यांच्यासह इतर मान्यवर, पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मताले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com